रायगड, नवी मुंबई
वर्ष १८ • अंक १०२
www.ramprahar.com
# राम प्रहर
गुरुवार, ३० ऑक्टोबर २०२५ • पाने ८ • किंमत ₹२

## अंतरंग

अलिबागमधील कचऱ्याच्या प्रश्नावर भाजप आक्रमक/२
परतीच्या पावसाने शेती पाण्यात; पिकांचे नुकसान/५
हिटमॅन रोहित शर्मा वनडेत अव्वल स्थानी/८

## भारताच्या सागरी क्षेत्रावर जगाचा विश्वास वाढला -पीएम मोदी

**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी (दि. २९) मुंबईतील इंडिया मेरीटाईम वीक



२०२५मध्ये संबोधित केले. या वेळी त्यांनी म्हटले की, हा कार्यक्रम २०१६मध्ये मुंबईत सुरू झाला होता. मुंबईत सुरू झालेला हा कार्यक्रम आता जागतिक कार्यक्रम बनला आहे. यामध्ये ८५हून अधिक देश सहभागी होत आहेत. येथे शिपिंग क्षेत्राशी संबंधित अनेक योजना सुरू करण्यात आल्या. शिपिंग क्षेत्रात लाखो कोटी रुपयांचे सामंजस्य करार झाले आहेत. यावरून भारताच्या सागरी क्षेत्रावर जगाचा विश्वास वाढल्याचे दिसून येते. पाच दिवसांच्या या परिषदेचे उद्‌घाटन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते २७ तारखेला झाले. केंद्रीय बंदर विकास, जहाजबांधणी आणि जलमार्गमंत्री सर्बानंद सोनोवाल; रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनीही या परिषदेला संबोधित केले.

# राज्याच्या सागरी उद्योग क्षेत्राची नवी भरारी

## अबूधाबी पोर्ट्स ग्रुपसोबत दोन अब्ज डॉलर्सचा सामंजस्य करार

**मुंबई : प्रतिनिधी**

देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच राज्य शासन, अबूधाबी पोर्ट्स ग्रुप आणि अबू धाबीचे इन्व्हेस्टमेंट सिर्सोस ॲण्ड प्रेसिडेन्शियल ऑफिस यांच्यात एक सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सागरी क्षेत्रात आंतरराष्ट्रीय सहकार्याचे नवे पर्व सुरू झाले असून यामध्ये भारताच्या बंदरे मंत्रालयाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

वर्षा निवासस्थानी झालेल्या या सामंजस्य करारावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मत्स्यव्यवसाय व बंदरेमंत्री नितेश राणे, बंदरे विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. प्रदीप तसेच अबूधाबी पोर्ट्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी अहमद



अल मुतावा, इक्विलाईन ग्रुपचे मुख्य कार्यकारी अधिकारी सलाह अल नासेर आणि रुरल एनहॅन्सर्स ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अंबर आयदे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

या करारानुसार जहाजबांधणी, जहाजविघटन, जलवाहतूक, बंदर पायाभूत सुविधा आणि क्रूझ व्यवस्थापन अशा विविध क्षेत्रांमध्ये तब्बल दोन अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत गुंतवणुकीची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे महाराष्ट्र देशातील एक अग्रगण्य सागरी केंद्र म्हणून अधिक बळकट होणार आहे.

अबूधाबी पोर्ट्सने देशात प्रथमच फक्त महाराष्ट्र शासनासोबत केलेला हा पहिलाच करार आहे. यामुळे जागतिक स्तरावर राज्याचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. या भागीदारीचा उद्देश तांत्रिक सहकार्य, बंदरांचे आधुनिकीकरण, लॉजिस्टिक विकास आणि सागरी रोजगारनिर्मिती यांना चालना देणे हा आहे.

हा करार राज्याच्या ब्लू इकॉनॉमी आधारित विकास २०३० या दीर्घकालीन दृष्टीकोनाशी सुसंगत आहे, ज्यामुळे सागरी क्षेत्रात शाश्वत विकास आणि जागतिक दर्जाच्या सुविधा निर्माण होतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## रायगडातील ३१५ नवीन अंगणवाडी केंद्रांना मंजुरी

**मुंबई : प्रतिनिधी**



महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत राज्यातील अंगणवाड्यांचे आधुनिकीकरण करण्यासाठी स्मार्ट अंगणवाडी किट खरेदीस राज्य शासनाने मान्यता दिली आहे. या योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील ३१५ अंगणवाडी केंद्रांना मंजुरी देण्यात आली असून या केंद्रांचे रूपांतर आदर्श आणि अत्याधुनिक सुविधांनी युक्त स्मार्ट अंगणवाड्यांमध्ये करण्यात येणार आहे.

या योजनेमुळे प्रत्येक अंगणवाडीत शिक्षण, आरोग्य, पोषण, स्वच्छता व बालसंगोपनासाठी आवश्यक असणारे अत्याधुनिक साहित्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. केंद्रांमध्ये मुलांसाठी आनंददायी, सुरक्षित आणि शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यास मदत होईल.


महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले की, स्मार्ट अंगणवाडी योजनेमुळे ग्रामीण तसेच शहरी भागातील लहान मुलांना सुरक्षित, स्वच्छ आणि आनंददायी शिक्षणाचे वातावरण उपलब्ध होईल. मुलांच्या सर्वांगीण विकासासोबतच महिलांच्या सक्षमीकरणासाठी ही योजना महत्त्वाचा टप्पा ठरेल.

या प्रकल्पामुळे अंगणवाडी सेविकांना तंत्रज्ञानाधारित शिक्षण पद्धती व पोषण व्यवस्थापनाचे प्रशिक्षण मिळणार आहे तसेच बालकांच्या वाढीचा, आरोग्याचा व पोषणस्थितीचा मागोवा घेण्यासाठी डिजिटल साधनांचा वापर होईल. नवीन अंगणवाड्या बालकांचे पोषण, आरोग्य तपासणी व पूर्व-शिक्षण अधिक परिणामकारकपणे पार पाडतील तसेच गर्भवती व स्तनदा महिलांना आरोग्यसेवा आणि पोषण मार्गदर्शन सुलभपणे उपलब्ध होईल. स्मार्ट अंगणवाडी योजना बालकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने उचललेले अत्यंत महत्त्वाचे व दूरदृष्टीचे पाऊल ठरेल.

### दर्जेदार शिक्षण, पोषण आणि आरोग्यसेवा मिळणार

रायगड जिल्ह्यातील माणगाव, तळा, श्रीवर्धन, रोहा, म्हसळा, महाड, अलिबाग, पोलादपूर, कर्जत, खालापूर, सुधागड आणि पनवेल या सर्व तालुक्यांतील अंगणवाड्या या योजनेत समाविष्ट आहेत. यामुळे ग्रामीण व आदिवासी भागातील बालकांना दर्जे दार शिक्षण, पोषण आणि आरोग्यसेवा मिळणार असून स्थानिक अंगणवाड्या आधुनिक शिक्षण व आरोग्य विकासाचे केंद्र म्हणून विकसित होतील.

## राष्ट्रपतींची **राफेल**मधून भरारी



**अंबाला : वृत्तसंस्था**

देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी बुधवारी (दि. २९) हरियाणामधील अंबाला हवाई दलाच्या तळावरून राफेल या अत्याधुनिक लढाऊ विमानातून ऐतिहासिक भरारी घेतली. राष्ट्रपती म्हणून त्यांचा हा पहिलाच अनुभव होता आणि या निमित्ताने त्यांनी फायटर पायलटचा विशेष सूट परिधान केला होता.

अंबाला येथे पोहचल्यानंतर राष्ट्रपती मुर्मू यांना जवानांनी गार्ड ऑफ ऑनर दिला. त्यानंतर त्यांनी राफेल विमानात बसून सुमारे २० मिनिटांची हवाई सफर केली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, राष्ट्रपतींनी ज्या विमानातून उड्डाण केले, त्याचे संचालन एका महिला वैमानिकाने केले.

या ऐतिहासिक क्षणी हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल अमरप्रीत सिंह, हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंह सैनी आणि अन्य वरिष्ठ संरक्षण अधिकारी उपस्थित होते. राष्ट्रपतींनी 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये सहभागी असलेल्या जवानांचा या वेळी सन्मान केला.

## शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत सरकार सकारात्मक : मुख्यमंत्री

**पुणे : प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत राज्य सरकार पहिल्या दिवसापासून सकारात्मक आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (दि. २९) दिली. शेतकरी नेते बच्चू कडू यांनी लोकांना त्रास होईल असे काही करू नये. त्यांनी चर्चेला यावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी पुण्यात प्रसारमाध्यमांशी बोलताना केले.



शेतकऱ्यांची कर्जमाफी, अतिवृष्टीग्रस्तांना तत्काळ मदत इतर मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख बच्चू कडू यांनी नागपूर येथे आंदोलन छेडले असून यात किसान सभा, स्वाभिमानी शेतकरी संघटना, राष्ट्रीय समाज पक्ष सहभागी झाले आहेत. सरकारने आंदोलक नेत्यांना काल चर्चेसाठी आमंत्रित केले होते, मात्र कर्जमाफी झाल्याशिवाय चर्चा होणार नाही, अशी भूमिका शेतकरी नेत्यांनी घेत आंदोलन सुरू ठेवले.

या पार्श्वभूमीवर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आंदोलनाच्या आधीदेखील आम्ही बैठक बोलावली होती. आपण चर्चा करून ज्या गोष्टी शक्य आहेत त्या करू, असे त्यांना सांगितले होते. पहिल्यांदा बच्चू कडूंनी त्याला मान्यता दिली. त्यानंतर त्यांनी अर्ध्या रात्रीत मला संदेश पाठवला की, लोक जमा होतील. त्यामुळे आम्ही काही बैठकीला येऊ शकणार नाही. मग आम्ही ती बैठक रद्द केली. आजही बावनकुळे यांनी त्यांच्याशी संपर्क केलेला आहे. शेवटी त्यांनी इतके वेगवेगळे प्रश्न मांडलेले आहेत. ते प्रश्न असे नुसते आंदोलनाच्या माध्यमातून त्या ठिकाणी सोडवता येतील अशी परिस्थिती आता नाहीये. त्यावर चर्चा करून रोडमॅप तयार करावा लागेल, त्यामुळे त्यांना चर्चेचे निमंत्रण दिले आहे.

शेतकऱ्यांसाठी आमच्या सरकारने ३२ हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले आहे. पैसे शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये आम्ही देत आहोत. त्यामुळे सगळ्या प्रकारच्या चर्चेची सरकारची तयारी आहे. चर्चा करावी आणि त्यातून मार्ग काढावा, असे आवाहन करून आंदोलनांमध्ये अनेक घातक प्रवृत्ती शिरतात, त्यापासून सावध राहायला हवे, असा इशाराही मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिला.

## निवडक

### 'स्थानिक' निवडणुकांमध्ये व्हीव्हीपॅट वापराची तरतूद नाही!

**मुंबई :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांशी संबंधित कायदे किंवा नियमांमध्ये व्हीव्हीपॅटचा वापर करण्याबाबत तरतूद नाही, शिवाय काही अपवाद वगळता जवळपास सर्वच स्थानिक निवडणुका बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीनुसार घेण्यात येतात. याबाबत समितीचा अद्याप अंतिम अहवाल सादर झालेला नाही. त्यामुळे सद्य:स्थितीत या निवडणुकांमध्ये व्हीव्हीपॅटचा वापर करणे शक्य नाही, असे राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे.

### दिवाळीत एसटी महामंडळाला ३०१ कोटी रुपयांचे उत्पन्न

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाला यंदाच्या दिवाळीत ३०१ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. गेल्या वर्षीच्या दिवाळी हंगामातील उत्पन्नापेक्षा ते ३७ कोटी रुपयांनी जास्त आहे. दिवाळीच्या शेवटच्या दिवशी ३९ कोटी ७५ लाख रुपये उत्पन्न मिळाले असून यंदाचे आतापर्यंतचे हे सर्वाधिक उत्पन्न आहे.

## पोलादपूर केवनाळे येथील पुनर्वसितांच्या घरांसाठी वाढीव निधीबाबत बैठक घ्यावी

### मदत व पुनर्वसनमंत्र्यांचे रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील केवनाळे (जि. रायगड) गावच्या कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी भूसंपादन करण्यात आले आहे. या जागेवर घर बांधण्यासाठी शासनाकडून प्रत्येक घरासाठी २.३० लाखांचा निधी उपलब्ध करून दिला आहे, मात्र या गावच्या नागरिकांनी घरासाठी वाढीव निधीची मागणी केली आहे. हा वाढीव निधी विविध कंपन्याच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून उपलब्ध होण्यासाठी संबंधित कंपन्यांच्या प्रतिनिधींसमवेत रायगड जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर बैठक घ्यावी, असे निर्देश मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिले.



मंत्री मकरंद जाधव-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली केवनाळे गावच्या कायमस्वरूपी पुनर्वसनासंदर्भात मंत्रालयात बैठक झाली. बैठकीस खासदार सुनील तटकरे, आपत्ती व्यवस्थापन विभागाचे संचालक डॉ. भालचंद्र चव्हाण, मदत व पुनर्वसन विभागाचे सहसचिव संजय इंगळे आदी उपस्थित होते.

केवनाळे येथील कुटुंबाचे खासगी मालकीच्या जागेत तात्पुरते पुनर्वसन करण्यात येऊन या ठिकाणी वीज, पाणीपुरवठा, शौचालय आदी सुविधांसाठी निधी वितरित करण्यात आला आहे. या नागरिकांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्यासाठी भूसंपादन करण्यात आले आहे. त्यांनी इरशाळवाडी व तळीये येथील नागरिकांना देण्यात आलेल्या घरांप्रमाणे घरे मिळावीत अशी मागणी केली आहे. यासाठी विविध कंपन्यांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून अधिकचा निधी मिळण्याबाबत बैठक घ्यावी, असे निर्देश मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी दिले.

केवनाळेतील नागरिकांना घर बांधणीसाठी प्रत्येक घरासाठी २.३० लाखांचा निधी राज्य गृह व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माणऐवजी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समितीमार्फत देण्यासाठी मंजुरी देण्यात आली असून हा निधी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत तहसीलदारांकडे वर्ग करण्यात आलाय, असेही त्यांनी सांगितले.

## सदिच्छा भेट



**पनवेल :** आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोयंजे पंचायत समिती विभागातील भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची बुधवारी सदिच्छा भेट घेऊन चर्चा केली. या वेळी अनंत पाटील, हभप दिनेशमहाराज मते, हभप संतोषमहाराज पाटील, सुभाष गायकर, हेमंतमहाराज दळवी आदी उपस्थित होते.

## अलिबागमध्ये रंगणार दोन दिवसीय जिल्हा साहित्य संमेलन

**अलिबाग : प्रतिनिधी**

मराठी भाषा विभाग व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व कलारंग सांस्कृतिक सामाजिक संस्था, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच कोकण साहित्य परिषद शाखा अलिबाग यांच्या सहकार्याने ८ व ९ नोव्हेंबर रोजी भंडारी भवन, श्रीबाग येथे जिल्हा साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने जिल्हास्तरीय काव्यलेखन स्पर्धा, कथालेखन स्पर्धा, दिवाळी अंक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

मराठी साहित्याचा प्रचार, प्रसार व संवर्धनाच्या उद्देशाने शासकीय अनुदानातून हे साहित्य संमेलन होत असून प्रसिद्ध कवी, गीतकार अरुण म्हात्रे यांची संमेलनाध्यक्ष म्हणून तर रायगडचे कवी, लेखक रमेश धनावडे यांची स्वागताध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली असल्याचे संमेलन कार्यकारिणी प्रमुख सुजाता पाटील यांनी जाहीर केले. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे सन्मानिय सदस्य भरत गावडे व विठ्ठल कदम यांच्या मार्गदर्शनाखाली हे संमेलन होणार आहे.

काव्यलेखन स्पर्धेकरिता दीपक पाटील (८८०६८०२१७५), कवितालेखन स्पर्धेकरिता रुपेश पाटील (८०८७५५८६४१), दिवाळी अंक स्पर्धेकरिता महेश कवळे (९४२११७१४८०) यांच्याकडे अधिक माहितीसाठी संपर्क साधावा. स्पर्धेसाठी साहित्य पोचण्याची अंतिम मुदत ५ नोव्हेंबर असून त्यानंतर आलेल्या साहित्याचा स्पर्धेसाठी विचार केला जाणार नाही. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा. याचबरोबर चर्चासत्र, परिसंवाद, मुलाखत, काव्यकट्टा, कथावाचन, व्याख्यान, सांस्कृतिक आविष्कार असे साहित्यिक कार्यक्रमही आयोजित करण्यात आले असून रायगड जिल्ह्यातील लेखक, कवी, साहित्यिकांनीसंमेलनाचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन कलारंग संस्थेचे अध्यक्ष प्रकल्प वाणी यांनी केले आहे.

दोन दिवसीय जिल्हा साहित्य संमेलन यशस्वी करण्यासाठी संमेलन कार्यकारिणी संचालक म्हणून माजी जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रसाद पाटील, माजी प्राचार्य संजिवनी नाईक, कलारंग संस्था समन्वयक एम.एस. बोघाणी, युवा कवी विजय म्हात्रे तसेच कोकण साहित्य परिषद शाखा अलिबागचे कार्यकारिणी सदस्य व सभासद कलारंगचे कलाकार परिश्रम घेत आहेत.

## अजय इंगुलकर खोपोली भाजपचे नवे अध्यक्ष

**खोपोली : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष खोपोली मंडळाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी अजय इंगुलकर यांच्यावर सोपवण्यात आली आहे.



या वेळी इंगुलकर यांनी आगामी नगर परिषद निवडणुकीत भाजपला निश्चितपणे घवघवीत यश मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

पूर्वीच्या अध्यक्षांनी राजीनामा दिल्यानंतर ही जागा रिक्त होती. या पदावर माजी सरचिटणीस अजय इंगुलकर यांच्या नावावर खोपोली मंडळात पदाधिकाऱ्यांनी शिक्कामोर्तब केल्यानंतर जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी त्यांच्या नावाची घोषणा केली.

आगामी पालिका निवडणुकीच्या निमित्ताने जिल्हाध्यक्ष कोळी, सरचिटणीस प्रकाश बिनेदार, दीपक बेहेरे, नितीन पाटील व खोपोली संपर्कप्रमुख सुनील घरत हे इच्छुकांच्या मुलाखतीसंदर्भात खोपोलीत आले असता अजय इंगुलकर यांची मंडळ अध्यक्षपदी नेमणूक जाहीर करण्यात आली.

या वेळी खोपोली निवडणूक यंत्रणा प्रमुख यशवंत साबळे, विधानसभा मतदारसंघ समन्वयक हेमंत नांदे, माजी शहर अध्यक्ष इंद्रमल खंडेलवाल, रमेश रेटरेकर, महिला आघाडी अध्यक्ष अश्विनी अत्रे, युवा नेते व नगराध्यक्षपदाचे इच्छुक उमेदवार विक्रम साबळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. आपल्या पदाचा स्वीकार केल्यानंतर इंगुलकर यांनी सर्व वरिष्ठ नेत्यांचे तसेच खोपोली मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे आभार व्यक्त केले. भाजपची ताकद वाढविण्यासाठी आणि नगर परिषदेवर पक्षाचा झेंडा फडकवण्यासाठी माझा प्रयत्न असणार असल्याचे ते म्हणाले.

## गड-दुर्गांचा जागर उपक्रम

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचे वैभव सांगणारे गड-दुर्ग हे मराठी अभिमानाचे प्रतीक आहेत. दिवाळीनिमित्ताने शिवरायांच्या या किल्ल्यांच्या प्रतिकृती साकारणाऱ्यांचा सन्मान करण्यासाठी श्री शिवराज्याभिषेक दिनोत्सव सेवा समिती, दुर्गराज रायगडच्या वतीने जागर गड-दुर्गांचा २०२५ हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

ही स्पर्धा नसून मावळ्यांना प्रोत्साहन देणारा उपक्रम आहे. यामध्ये पर्यावरणपूरक साहित्य वापरावे. सर्व सहभागींना प्रमाणपत्र, तर दहा उत्कृष्ट गड-दुर्गांना विशेष सन्मानचिन्हे प्रदान केले जाईल. आपल्या गड-दुर्गाचा फोटो किंवा रील Instagramवर पोस्ट करून rajyabhisheksamiti ला टॅग करा आणि स्वराज्याच्या गौरवयात्रेत सहभागी व्हा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## फलटणमधील डॉक्टर तरुणीचे हॉटेलमधील सीसीटीव्ही फुटेज समोर



**फलटण :** फलटण उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर तरुणीच्या आत्महत्या प्रकरणात तिची हत्या झाल्याचे आरोप विरोधकांकडून होत असताना हॉटेल मालकाने सीसीटीव्ही फुटेज समोर आणले आहे. यानुसार ही महिला डॉक्टर मध्यरात्री दीडच्या सुमारास हॉटेलमध्ये राहण्यास आली होती, असे समोर आले आहे.

हॉटेलमध्ये डॉक्टर तरुणीला बोलावून तिची हत्या करण्यात आली, असा आरोप ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केला होता. यावर हॉटेल मधुदीपचे मालक दिलीप भोसले यांनी बुधवारी (दि. २९) पत्रकार परिषद घेऊन आपली बाजू स्पष्ट केली. सीसीटीव्ही फुटेज दाखवत भोसले यांनी, ही तरुणी २३ ऑक्टोबरला मध्यरात्री दीड वाजता हॉटेलमध्ये आली होती. तिची चेक-इनची प्रक्रिया पूर्ण करून तिला रूम देण्यात आली. ती एकटीच आली होती व तिला तिची गाडीही हॉटेलच्या आवारात पार्क करता आली नाही. सिक्युरिटीने ती पार्क केली होती. ती खूप चिंतेत दिसत होती. चेकइनवेळी तिने आपल्याला सकाळी ९.३०ला बारामतीला जायचे असल्याचेही सांगितले होते, असा घटनाक्रम सांगितला.

दुसऱ्या दिवशी सकाळी साडेनऊच्या सुमारास तरुणीने हॉटेलमध्ये इंटरकॉमवर फोन केला होता, तोपर्यंत ती व्यवस्थित होती. दुपारी १२.३० ला कर्मचाऱ्यांची शिफ्ट चेंज झाली, तरीही ती बाहेर आली नसल्याने दार वाजविले. पोलीस येण्यास उशीर असल्याने आम्ही वकिलांच्या सल्ल्याने रूम उघडली तेव्हा तिने गळफास घेतल्याचे दिसले, असेही भोसले यांनी सांगितले.

# महाराष्ट्रातही राज्य उत्पादन अभियान राबवणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

**पुणे : प्रतिनिधी**

केंद्र सरकार राष्ट्रीय उत्पादन अभियान (नॅशनल मन्युफॅक्चरिंग मिशन) सुरू करत असताना त्याबरोबरीने महाराष्ट्र शासनही 'राज्य उत्पादन अभियान' सुरू करेल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. तसेच राज्यात जागतिक दर्जाची 'ग्लोबल फ्रंटियर टेक्नॉलॉजी इन्स्टिटयूट' स्थापन करण्यात येईल, असेही त्यांनी घोषित केले.

नीती आयोगाच्यावतीने यशदा येथे 'रिइमॅजनिंग मॅन्युफॅक्चरिंग : इंडियाज रोडमॅप टू ग्लोबल लिडरशीप इन डव्हान्स्ड मॅन्युफॅक्चरिंग' या विषयावर आयोजित 'द रोड टू इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६' या परिषदेत ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्ही. आर. सुब्रमण्यम, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मित्रा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी




प्रवीण परदेशी, नीती आयोगाच्या डिस्टिंग्विश्ड फेलो देबजानी घोष, सीआयआयचे महासंचालक चंद्रजीत बॅनर्जी आदी उपस्थित होते.

मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रासंदर्भातील रोडमॅप असलेला अत्यंत चांगला अहवाल पुण्यात प्रकाशित केल्याबद्दल नीती आयोगाला धन्यवाद देऊन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पुण्यात या क्षेत्रातील उन्नत तंत्रज्ञान पाहायला मिळते. उत्पादन क्षेत्राच्या विकासासाठी नव्या विचाराने पुढे जावे लागेल. त्यासाठी फ्रंटियर टेक्नॉलॉजी आवश्यक आहे. नव्या तंत्रज्ञानामुळे जागतिक स्पर्धेत स्थान पक्के करण्यासोबत नव्या क्रांतीला सामोरे जाणे गरजेचे आहे. आज 'एआय', क्वांटम कंम्प्युटिंग आणि सेमीकंडक्टर्स या तीन स्तंभांनी प्रत्येक क्षेत्राला मोठ्या प्रमाणात प्रभावित केले आहे. त्याचा फायदा उठविण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत, असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्र्यांनी पुढे नमूद केले की, देशाला प्रगत उत्पादन (ॲडव्हान्स्ड मॅन्युफॅक्चरिंग) क्षेत्रात पुढे नेताना त्याचे नेतृत्व महाराष्ट्र करेल, त्यासाठी राज्याचे मॅन्युफॅक्चरिंग मिशन सुरू केले जाईल. राज्याने विकसित महाराष्ट्र २०४७ व्हिजन तयार केले असून मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रातील परिवर्तन हादेखील त्याचा एक भाग आहे. डव्हान्स्ड मॅन्युफॅक्चरिंगला चालना दिली जाणार असून त्यामुळे या क्षेत्रात मोठे परिवर्तन दिसेल. इतर देशांना भारताकडे आकर्षित करताना यासाठी आवश्यक सुविधा निर्माण कराव्या लागतील. असे केल्यास उत्तम तसेच कल्पक बुद्धिमत्ता असलेल्यांना आपल्याकडे आकर्षित करता येईल. महाराष्ट्राने इज ऑफ डुइंग बिझनेस अंतर्गत कृतीदल स्थापन केला असून त्याअंतर्गत १०० सुधारणा करणे निश्चित केले असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

या वेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते 'इंडियाज रोडमॅप टू ग्लोबल लीडरशीप इन ॲडव्हान्स्ड मॅन्युफॅक्चरिंग' चे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाला निती आयोगाचे अधिकारी तसेच उद्योगांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### डेटा सेंटर शहर आणि इनोव्हेशन सिटीही होणार

महाराष्ट्र हे देशाचे डेटा सेंटर कॅपिटल झाले आहे. पुणे मॅन्युफॅक्चरिंग, तंत्रज्ञान क्षेत्राचे शहर आहे. पुणे व मुंबईदरम्यान क्वांटम कॉरिडॉर तयार करण्याचे राज्य शासनाने निश्चित केले आहे. नवी मुंबई डेटा सेंटर शहर असून पुणे-मुंबईदरम्यान इनोव्हेशन सिटी उभारण्यात येणार आहे.

# 'लाडकी बहीण'च्या केवायसीबाबत आवाहन



**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण या योजनेमध्ये पारदर्शकता येण्यासाठी व लाभार्थ्यांना नियमितपणे आर्थिक लाभ मिळावा याकरिता https://ladakibahin.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ई-केवायसी ची सुविधा १८ सप्टेंबरपासून दोन महिन्याच्या कालावधी करीता उपलब्ध करण्यात आली आहे.

ई-केवायसीची प्रक्रिया अत्यंत सोपी व सुलभ असून आत्तापर्यंत अनेक लाभार्थ्यांनी ई-केवायसी ची प्रकिया यशस्वी पूर्ण केली आहे. इतर लाभार्थ्यांनी ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले आहे.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांचे ई-केवायसी माध्यमातून आधार प्रमाणीकरण केले जात आहे. ही प्रक्रिया अतिशय सोपी व सुलभ असून, महिला स्वत:च्या मोबाईलवरूनही ही प्रक्रिया कमी वेळात पुर्ण करू शकतात. ज्यांनी अद्याप ई-केवायसी केली नाही त्यांनी १८ नोव्हेंबरपर्यंत ही प्रक्रिया पुर्ण करावी.

# कर्जत चारफाटा येथे वाहनांसाठी सिग्नल यंत्रणा कार्यान्वित

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतमध्ये प्रवेश करण्यासाठी महत्वाचा चौक असलेल्या कर्जत चारफाटा येथे दररोज वाहतूक कोंडी होत असते. वाहतूक कोंडी फोडण्यासाठी अनेक उपाययोजना पोलिसांनी केल्या, मात्र वाहतूक कोंडी कमी करण्यात यश येत नव्हते. त्यामुळे आता कर्जत पोलिसांनी चारफाटा येथे सिग्नल यंत्रणेचा वापर केला जाणार आहे. कर्जत शहर बचाव समितीकडून अनेक महिने ही मागणी लावून धरली होती. दरम्यान, कर्जत चारफाटा येथील सिग्नल यंत्रणा कार्यान्वित झाली.

कर्जत तालुका हा पर्यटन तालुका झाला आहे. शनिवार, रविवार या विकेंडचे दिवशी मोठ्या प्रमाणात पर्यटक आणि फार्महाउसमालक



येत असतात. विकेंडमध्ये मुंबईकर सातत्याने कर्जतमध्ये त्यांची ये-जा असते. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून ट्रॅफीकने कर्जतचे नागरीक खुप त्रस्त होते. अनेक रुग्णांनासुद्धा रुग्णालयात वेळेवर पोचता येत नव्हते. वाहनचालकांच्या सततच्या तक्रारीचा विचार करून कर्जत शहर बचाव समितीने कर्जत नगर परिषदेला निवेदन दिले होते.

निवेदनाची कर्जत प्रशासनाने तसेच कर्जत पोलिस स्टेशन यांनी तातडीने दखल घेऊन सिग्नल सिस्टीम बसविण्याबाबत तत्परता दाखवुन त्याची निविदा काढली होती. कर्जत चारफाटा येथे सिग्नल यंत्रणा बसवून तयार होती. कर्जत शहर बचाव समितीने ही मागणी अनेक महिने लावून धरली होती आणि या मागणीला यश आल्याने समितीचे प्रमुख ॲड. कैलास मोरे हे आग्रही होते.

सायंकाळपासून कर्जत चारफाटा येथे सिग्नल यंत्रणा सुरू झाली असून कर्जत पोलीस आता नियम मोडणाऱ्या वाहन चालक यांच्यावर सहज कारवाई करू शकणार आहेत, मात्र सिग्नल यंत्रणा सुरू झाल्याने आता चारफाटा येथील वाहतूक कोंडीची समस्या कमी होणार आहे. चारफाटा येथे आता चार ठिकाणी दिशा यांनी येणारे वाहने यांना नियंत्रणात आणली जाणार आहेत. चारफाटा येथे सिग्नल बसवले असल्याने वाहतूक कोंडी ही समस्या कमी होण्यास मदत होईल, असा विश्वास ॲड. मोरे यांनी व्यक्त केला.

# अलिबाग तालुक्यातील कचरा व्यवस्थापनाच्या प्रश्नावर भाजप आक्रमक

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबाग तालुक्यातील कचरा व्यवस्थापनाच्या प्रश्नावर भाजपचे नेते माजी आमदार पंडित पाटील आणि भाजप महिला मोर्चा दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष डॉ. चित्रा पाटील यांच्यासह भाजपचे पदाधिकारी आक्रमक झाले आहेत. मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत दोन्ही नेत्यांनी संबंधित कंपनीच्या सीएसआर निधीच्या वाटपाबाबत ठोस भूमिका मांडली.

या बैठकीत कचरा व्यवस्थापनासाठी निधीची उपलब्धता तसेच कंपन्यांकडून मिळणारा सीएसआर फंड योग्य पद्धतीने वापरणे यावर सविस्तर चर्चा झाली. या वेळी पंडित पाटील यांनी स्पष्टपणे सांगितले



की, ज्या कंपनीकडून सीएसआर निधी दिला जातो, त्या कंपनीच्या कार्यक्षेत्रातील आणि आजूबाजूच्या ग्रामपंचायतींना या निधीचा थेट फायदा मिळायला हवा. आमचा विकासाला विरोध नाही, परंतु स्थानिकांना याचा फायदा झाला पाहिजे.

भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. चित्रा पाटील यांनीही सांगितले की, अलिबाग तालुक्यातील स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापन हा गंभीर विषय आहे.

या निधीचा वापर गावागावातील घनकचरा प्रकल्प, साफसफाई साहित्य तसेच जागृती मोहिमांसाठी व्हावा, अशी आमची मागणी आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी नेत्यांच्या सूचना सकारात्मकपणे घेत सीएसआर निधी स्थानिक विकासासाठी वापरण्याबाबत योग्य नियोजन करण्याचे आश्वासन दिले.

# केंद्रीय मत्स्यव्यवसाय सचिवांनी घेतला रायगड क्लस्टरचा आढावा



**रायगड : रामप्रहर वृत्त**

मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्रालयाच्या मत्स्यव्यवसाय विभागाचे केंद्रीय सचिव, डॉ.अभिलक्ष लिखी यांनी मंगळवारी (दि.२८) जिल्हा नियोजन सभागृह येथे रायगड जिल्ह्यातील मत्स्यव्यवसाय सहकारी क्लस्टरला भेट देऊन त्याच्या प्रगतीचा आढावा घेतला आणि सहकारी हितधारकांशी थेट संवाद साधला.

हा क्लस्टर एकात्मिक मत्स्यव्यवसाय मूल्य-साखळी विकासासाठीचे मॉडेल म्हणून विकसित केले जात आहे. प्रत्यक्ष तळाच्या स्तरावरील आव्हानांचे मूल्यमापन करणे आणि सहकार-नेतृत्वाखालील दृष्टिकोनातून मत्स्यव्यवसाय-आधारित उपजीविका मजबूत करण्यासाठी संधी विचारात घेणे हा या भेटीचा उद्देश होता. संवादादरम्यान, डॉ. लिखी यांनी रायगड, महाराष्ट्रातील १५६ प्राथमिक मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था आणि नऊ मत्स्य शेतकरी उत्पादक संस्थांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या २५१ सदस्यांची भेट घेतली.

रायगडमधील मत्स्यव्यवसाय सहकारी क्लस्टरला भेट देताना, डॉ. लिखी यांनी राष्ट्रीय मत्स्यव्यवसाय विकास मंडळाला या योजनेची अधिक व्यापक पोहोच आणि प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये जागरूकता, प्रशिक्षण आणि तक्रार निवारण शिबिरे आयोजित करण्याचे निर्देश दिले. त्यांनी मत्स्यव्यवसाय मूल्य साखळीमध्ये एकात्मिक विकास साधण्यासाठी क्लस्टर-आधारित दृष्टिकोनाचे महत्त्व अधोरेखित केले आणि हितधारकांना निर्यात वाढवण्यासाठी, पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी, आर्थिक उपलब्धता वाढवण्यासाठी आणि बाजारपेठ जोडणी मजबूत करण्यासाठी नवीन कार्यपद्धती स्वीकारण्यास प्रोत्साहित केले.

या बैठकीला जिल्हाधिकारी किशन जावळे आणि महाराष्ट्राचे मत्स्यव्यवसाय आयुक्त किशोर तावडे यांच्यासह रायगड, मुरुड, करंजा, उरण, श्रीवर्धन, रोहा, पेण आणि इतर प्रदेशातील मच्छीमार सहकारी संस्थांच्या मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त सिडको महामंडळातर्फे प्रभातफेरी



**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

केंद्रीय दक्षता आयोगातर्फे भ्रष्टाचारविरोधी जनजागृती निर्माण करण्यासाठी दरवर्षी ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. त्या अनुषंगाने सिडको महामंडळामध्येदेखील २७ ऑक्टोबर २०२५ ते ०२ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. त्या निमित्ताने २९ ऑक्टोबर २०२५ रोजी दक्षता जनजागृती सप्ताहाविषयी नागरीकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी सिडकोतर्फे प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले.

या प्रभातफेरीत डॉ. राजा दयानिधी, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, तसेच सुरेश मेंगडे, पोलीस उपमहानिरीक्षक तथा मुख्य दक्षता अधिकारी, सिडको यांच्यासह सिडकोचे विभाग प्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी यांनी देखील मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

प्रभातफेरी सिडको भवन ते बेलापूर, सेक्टर ११पर्यंत आयोजित करण्यात आली होती. या प्रभातफेरीप्रसंगी अधिकारी व कर्मचारी यांनी विविध फलक व घोषणा यांच्या माध्यमातून नागरिकांना दक्षता : आमची सामायिक जबाबदारी या उक्तीचा आपल्या दैनंदिन जीवनात देखील अवलंब करण्याचे आवाहन केले.

# जिल्हा न्यायालयात सायबर कायद्याविषयी साक्षरता कार्यक्रम

**अलिबाग : प्रतिनिधी**

एआय युगातील सायबर क्राईम आणि त्यावरील कायदेशीर उपाययोजनांविषयी जनजागृती करण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड - अलिबाग आणि जिल्हा न्यायालय अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने विधी साक्षरता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात सायबर कायदा तज्ञ ॲड. प्रशांत माळी (बॉम्बे हायकोर्ट) यांनी एआय युगातील सायबर क्राईम आणि सायबर कायदे या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

ॲड. माळी यांनी आपल्या भाषणात सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण, त्यांचे सामाजिक-आर्थिक परिणाम तसेच डिजिटल सुरक्षिततेसाठी घ्यावयाची काळजी याबाबत उपस्थितांना माहिती दिली. त्यांनी सायबर तंत्रज्ञानाचे फायदे जसे की जलद संवाद, डिजिटल व्यवहार, माहितीची देवाणघेवाण यांबरोबरच त्यातील तोटे - डेटा चोरी, ऑनलाइन फसवणूक, सोशल मीडिया गैरवापर,




बनावट ओळख निर्मिती - यांवरही प्रकाश टाकला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगडचे अध्यक्ष राजेंद्र द. सावंत हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा न्यायाधीश (एक) श्रीमती सृष्टी नीलकंठ, जिल्हा न्यायाधीश (३) एस. डी. भगत, मुख्य न्यायदंडाधिकारी श्रीमती ए. बी. अत्तार आणि वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश दि. बी. बी. गवारे उपस्थित होते.

जिल्हा न्यायाधीश (एक) श्रीमती सृष्टी नीलकंठ यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सायबर गुन्ह्यांविषयी जागरूकता वाढविण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्या म्हणाल्या की, डिजिटल युगात प्रत्येकाने तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर करणे अत्यावश्यक आहे. जागरूक नागरिक बनल्यास सायबर गुन्ह्यांपासून बचाव शक्य आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश तथा सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तेजस्विनी निराळे यांनी केले. अलिबाग बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. प्रसाद पाटील यांनी सायबर कायद्याविषयी जनजागृतीचे महत्त्व स्पष्ट केले.

अलिबाग बार असोसिएशनचे सचिव ॲड. अमित देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन एलईडीसीएस प्रमुख चंद्रशेखर कामते यांनी केले. या कार्यक्रमास वकील व न्यायालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तंटा मिटणार अन् मालकी मिळणार; ३० दिवसांतच जमीन मोजणी होणार!

**खारघर : प्रतिनिधी**

राज्य सरकारने जमीन मोजणीचा निपटारा अवघ्या ३० दिवसांवर आणला आहे. त्यासाठी महसूल विभागाने परवानाधारक खासगी भूमापकांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला. यामुळे पोटहिस्सा, हद्द कायम, बिनशेती, गुंठेवारी, संयुक्त भूसंपादन मोजणी, वनहक्क दावे, नगर भूमापन, गावठाण भूमापन, सीमांकन आणि मालकीहक्कासाठी अत्यावश्यक मोजणी प्रक्रिया लवकर पूर्ण होईल. राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महत्वाचा निर्णय घेतला आहे.

ही मोजणी करण्यासाठी खासगी भूसंपादकाची नियुक्ती करण्यात येणार आहे. अनेक वर्षांपासून जमीन मोजणीसाठी नागरिकांना ताटकळत राहावे लागत होते, या निर्णयामुळे ही प्रक्रिया आता गतिमान होणार आहे. महसूल विभाग आणि भूअभिलेख विभाग यांच्या संयुक्त प्रयत्नांतून हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येणार आहे. मोजणी प्रकरणांचा ३० दिवसांत निपटारा करण्यासाठी परवानाधारक खासगी भूमापकांची नियुक्ती करण्यात येणार आहे.

जमीन नोंदणी जलदगतीने होईल, जमीन नोंदीतील चुकांचे निराकरण सुलभ होईल, बँक कर्ज आणि विमा प्रक्रियेत अडचणी कमी होतील, डिजिटल सातबारा आणि मालकी हक्क प्रमाणपत्र सहज मिळेल,जमीन मोजणी प्रक्रियेसाठी शेतकऱ्यांना भूमी अभिलेख कार्यालयाच्या वेबसाइटवर नोंदणी करावी लागेल.पूर्वीसारख्या कार्यालयाता खेटा मारण्याची गरज नाही. एका क्लिकवर काही कागदपत्रांसह शुल्क भरून जमीन मोजणीसाठी अर्ज करता येतो, असे शेतकऱ्यांना मिळणारे फायदे आहेत.

महसूल आणि भूअभिलेख विभाग आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने एकत्रित मोहीम राबवणार आहेत. डिजिटल जमीन नोंदीमुळे मालकी हक्काचे प्रमाणपत्र, सातबारा उतारे आणि बँक व्यवहार सोपे होतील. महाराष्ट्र सरकारच्या mahabhumi.gov.in या पोर्टलवर ऑनलाईन जमीन नोंदी पाहता येतील.

# वीज बिल वाटपाचा घोळ, ग्राहकांना भुर्दंड; चौक परिसरात सावळागोंधळ

**चौक : प्रतिनिधी**

गेले काही महिन्यापासून महाराष्ट्र राज्य वीज महामंडळ यांच्या मार्फत ग्राहकांना देण्यात येणाऱ्या वीज बिल ग्राहक यांच्या पर्यंत न पोहचल्याने वीज ग्राहक यांना त्रास आणि आर्थिक भुर्दंड पडत आहे, मात्र त्याची दखल घेताना कोणीही दिसत नाही.

खाजगीकरण दिशेने सर्वच शासकीय यंत्रणांचे पाऊल पडत असल्याने त्याचा त्रास सर्व सामान्य जनतेला होताना दिसत आहे.पूर्वी वीज वितरण कंपनी यांच्यामार्फत आणि अधिकृत कर्मचारी यांच्या कडून वीज ग्राहक यांना वीज बिले देण्यात येत होती, पण गेली काही वर्ष विद्युत मीटर रिडिंग आणि वीज बिल वितरणाचे काम खाजगी संस्था यांना देण्यात आल्याने वीज बिल वाटपाच्यात प्रचंड घोळ सुरु असून वेळेवर रिडिंग होत नाही, आणि त्याचा परिणाम उशिरा बिल वाटण्यात होतो. यामुळे वीज बिल भरण्यास ग्राहकांना उशीर होतो, त्याचा फटका ग्राहकांना बसून विलंब आकार भरावा लागत असल्याने आर्थिक नुकसान होतच आहे, शिवाय उशिरा बिल भरल्याने वीज पुरवठा खंडित करण्यासाठी वीज वितरण कंपनी यांच्या कर्मचारी यांच्याकडून वीज पुरवठा खंडित करण्यात येतो. त्याचाही फटका ग्राहक यांना बसत आहे.

स्थानिक अधिकाऱ्यांनी वीज बिल भरण्यासाठी ग्राहक यांना मुदत वाढ द्यावी, अशी मागणी चौक परिसरातून होत आहे. गेले काही दिवस वारंवार वीजपुरवठा खंडित होत आहे, मात्र तो वेळेवर दुरुस्त होत नाही, पण एक दिवस वीज बिल भरण्यासाठी उशीर झाला तर, वीज पुरवठा खंडित करण्यासाठी कर्मचारी धाऊन येताना दिसत आहे, चौक परिसरातील वीज बिल वाटपाचे काम एका खासगी संस्थेला दिले आहे, मात्र त्यांचे कर्मचारी हे वेळेवर रिडिंग घेत नाहीत, त्यामुळे वीज बिल वाटपाचे काम होत नाही, मात्र वीज बिल भरण्यासाठी उशिरा झाला तर वीजपुरवठा खंडित केला जाणार नाही, असे चौकचे कनिष्ठ अभियंता देसाई यांनी सांगितले.

# कामोठ्यातील पाणीप्रश्नी भाजप आक्रमक

## सिडको भवनावर मोर्चा; समस्या मार्गी लावण्याची मागणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठेकरांचा पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून, या विरोधात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सिडको कार्यालयावर बुधवारी (दि.२९) मोर्चा काढण्यात आला. अनियमित आणि अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे त्रस्त झालेल्या कामोठेवासीयांना दिलासा देण्यासाठी हा मोर्चा काढण्यात आला होता. या वेळी सिडको अधिकाऱ्यांनी भाजपच्या शिष्टमंडळाला कामोठे परिसरातील पाण्याचा प्रश्न मार्गी लावून कमी पडणाऱ्या पाण्याचा तुटवडा भरून काढणार असल्याचे आश्वासित केले.

कामोठे शहरात गेल्या काही महिन्यांपासून अनियमित पाणीपुरवठा सुरू आहे. शहरासाठी ५० एमएलडी पाण्याची आवश्यकता असताना सध्या केवळ ३० ते ३५ एमएलडी अपुरे पाणी मिळत आहे. काही दिवसांपासून तर जो पाणीपुरवठा होत होता, तोदेखील बंद झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. या संदर्भात भारतीय जनता पार्टी तसेच कामोठेमधील नागरिकांनी सिडको पाणीपुरवठा विभागाकडे वारंवार पत्रव्यवहार केला आहे. बुधवारी या सर्व गोष्टींचा कडेलोट झाला आणि भारतीय जनता पार्टीचे कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत यांच्या नेतृत्वाखाली सीबीडी बेलापूर येथील सिडको कार्यलयावर मोर्चा काढण्यात आला. कामोठकरांचा आक्रोश पाहून सिडकोच्या अधिकाऱ्यांनी भाजपचे शिष्टमंडळाला या विषयावर तोडगा काढण्यासाठी सिडकोच्या अधिकाऱ्यांमध्ये बैठकीचे आमंत्रण दिले.

सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. राजा दयानिधी यांच्यासोबत झालेल्या बैठकीत सिडकोने पाण्याचा प्रश्न लवकर मार्गी लावून पाण्याची कमतरता भरून काढण्याचे आश्वासन दिले आहे. तसेच सिडकोचे अभियंता आणि कामोठे परिसरातील लोकप्रतिनिधींची एक समिती स्थापन करण्यात येणार असून, परिसराचा सर्व्हे करून पाणी चोरी आणि वितरणाच्या मध्ये येणाऱ्या अडचणींवर त्वरित तोडगा काढण्यात येईल तसेच कामोठेवासीयांसाठी नवी मुंबई महापालिकेच्या मोरबे येथील धरणातून १५ एमएलडी पाणी उपलब्ध करून देण्याबाबत या बैठकीत आश्वासन देण्यात आले आहे. नवीन भूखंडांना ओसी प्रमाणपत्र तसेच सीसी प्रमाणपत्र तात्काळ थांबविण्यात यावेत, या आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या मागणीचा पुनरुच्चार या बैठकीमध्ये विकास घरत यांनी केला. याबाबत लवकरच बैठक घेऊन निर्णय घेणार असल्याचे ही या बैठकीत सिडकोच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

दरम्यान, कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत यांनी या संदर्भात मल्हार टीव्हीला अधिक माहिती दिली तसेच कामोठेवासीयांचा पाण्याचा प्रश्न निकाली लागला नाही, तर आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली मोठे जनआंदोलन उभारले जाईल, असा इशारा सिडकोला दिला. या वेळी भाजपचे कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विजय चिपळेकर, माजी नगरसेवक कुसुम म्हात्रे, हेमलता गोवारी, भाजपनेते रवी जोशी, प्रदीप भगत, रमेश तुपे, रावसाहेब बुधे, नाना मुकदूम, सुशील शर्मा, हर्षवर्धन पाटील, दामोदर चव्हाण, विद्या तामखेडे, हरजिंदर कौर, सुरेश खरात, राजेश म्हात्रे, उत्तम जगर, तेजस जाधव, आदित्य भगत, अमोल बिनवडे, निलेश सरगर, अमित गोडसे यांच्यासह सिडकोचे अधिकारी श्री. मेंगडे, शिळा श्री. फुलारी, भगवान गायकवाड यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कामोठेतील नागरिक उपस्थित होते.

## निवडक




### कार नाल्यात कोसळली

**पनवेल :** चारचाकी कार नाल्यात कोसळल्याची घटना २६ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी साडेसहाच्या सुमारास घडली. सुदैवाने यात कोणतेही जीवितहानी झाली नाही, मात्र कारचे नुकसान झाले. रविवारी मोठ्या प्रमाणात पाऊस कोसळत होता. वीजदेखील गायब झाली होती. याच दरम्यान शांतीवनकडून पनवेलच्या दिशेने वेगाने एक चार चाकी कार जात होती. या वेळी महिलेचे कारवरील नियंत्रण सुटले आणि चार चाकी कार थेट नाल्यात जाऊन कोसळली. नेरे स्टॉपवर संध्याकाळच्या सुमारास मोठ्या प्रमाणात गर्दी असते. वेगाने आलेली कार नाल्यात कोसळल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र तीच कार वेगाने बस स्टॅन्डजवळील नागरिकांना धडकली असती तर मोठी दुर्घटना घडली असती. सुदैवाने असा कोणताही प्रकार झाला नाही.

### खारघरमध्ये इमारतीला आग

**पनवेल :** खारघर सेक्टर ७ मधील रावेची हाइट्स या निवासी



इमारतीत बुधवारी दुपारी आगीची लागल्याची घटना घडली आहे. प्राथमिक माहिती नुसार, दुसऱ्या मजल्यावरील एका फ्लॅटमध्ये ही आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. आगीत घरातील साहित्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दुपारच्या सुमारास फ्लॅटमधून अचानक धुराचे लोट बाहेर येताना पाहून इमारतीतील रहिवाशांनी तत्काळ पोलिसांना व अग्निशामक दलाला याबाबत कळवले आहे.

### पनवेल मनपातर्फे लोकशाही दिन

**पनवेल :** सर्व सामान्य जनतेच्या तक्रारी व समस्या तत्परतेने सोडविण्यासाठी ३ नोव्हेंबर रोजी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली महापालिका मुख्यालयात लोकशाही दिन घेण्यात येणार आहे.नागरिकांच्या तक्रारी, अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांमध्ये संवादवाढीसाठी महापालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत आहे. नागरिकांनी आपले वैयक्तिक अर्ज समन्वय अधिकाऱ्यांकडे पंधरा दिवस आधी द्यावेत. संबंधित नागरिकांनी लोकशाही दिनादिवशी उपस्थित रहावे, असे आवाहन मनपातर्फे करण्यात आले आहे.

### पनवेलमध्ये आज गुणगौरव सोहळा

**पनवेल :** रायगड जिल्हा वैश्य समाज संघ आणि रायगड जिल्हा वैश्य समाज युवक संघ, शिक्षण समिती आयोजित मनोज महादेव आंग्रे पनवेल वैश्य ग्लोबल चॅरिटेबल ट्रस्ट पुरस्कृत जिल्हास्तरीय शैक्षणिक विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याचे आयोजन जेष्ठ नागरिक समाज संघ हॉल ठाणा नाका, पनवेल येथे ३० ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोक भोपतराव, प्रमुख पाहुणे विलास मनोरे, डॉक्टर संतोष कामेरकर, मीरा आंग्रे, रूपाली तेलवणे असणार आहेत. प्रमुख वक्ते कृष्णा म्हस्कर, डॉक्टर अजय चौगुले आहेत. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# तळोजा एमआयडीसीतील कॅमेऱ्यांचा पोलीस, पनवेल मनपासाठी ॲक्सेस

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई विमानतळ, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सोयीसुविधांनी युक्त अशी वेगवेगळी शहरे आणि लगतच उभे राहाणारे वेगवेगळे उद्योग यामुळे गेल्या काही वर्षांपासून स्मार्ट उद्योग क्षेत्राच्या धर्तीवर विकसित केल्या जाणाऱ्या तळोजा एमआयडीसी परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा थेट वापर करण्याचा अधिकार आता नवी मुंबई पोलीस तसेच पनवेल महापालिकेलाही मिळेल अशी व्यवस्था आता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून उभी केली जात आहे.

एमआयडीसीने तळोजा औद्योगिक पट्ट्यात ३१३ कॅमेरे बसविण्याचे काम वर्षभरापूर्वी सुरू केले आहे. तळोजा तसेच महापे भागात या कॅमेऱ्यांच्या माध्यमातून कंट्रोल आणि कमांड स्थानकेही उभारली जात आहेत. या स्थानकांचा उपयोग नवी मुंबई पोलीस तसेच पनवेल महापालिकेला करून देण्याचा प्रस्ताव एमआयडीसीने तयार केला आहे. औद्योगिक सुरक्षेसाठी अतिशय महत्त्वाच्या ठरणाऱ्या या संपूर्ण प्रकल्पाचा उपयोग आता शहरी पट्ट्यांनाही होईल अशा पद्धतीची आखणी यानिमित्ताने केली जात आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सन १९७० मध्ये ८६६.९८ हेक्टर क्षेत्रावर तळोजा औद्योगिक क्षेत्र विकसित केले आहे. तळोजा



औद्योगिक क्षेत्रात आतापर्यंत एकूण ९८५ भूखंडांचे आरेखन करण्यात आले आहे. एमआयडीसीच्या धोरणाप्रमाणे येथे उद्योजकांना रस्ते, पाणीपुरवठा, सामायिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र, पथदिवे यासारख्या सुविधा पुरविण्यात येतात. तसेच बँक, पोस्ट ऑफिस, दूरध्वनी केंद्र, पोलीस स्टेशन, अग्निशमन दल यासारख्या सामायिक सुविधाही गेल्या काही वर्षांत या पट्ट्यात उभ्या करण्यात आल्या आहेत. सद्य:स्थितीत तळोजा औद्योगिक क्षेत्रात मेसर्स दीपक फर्टिलायझर, असाही इंडिया टेक्नोव्हा, ओवेन्स कॉर्नीग, आय.जी.पी.एल. भारत इलेक्टॉनिक्स, हिंदाल्को, बॉम्बे ब्रेवरीज, व्ही. व्ही.एफ, पी.सी.एल. इत्यादी आंतरराष्ट्रीय पातळीचे उद्योग उभे आहेत.

तळोजा आणि ठाणे-बेलापूर औद्योगिक पट्टा नागरी वस्त्यांना खेटून असल्याने नवी मुंबई आणि पनवेल या दोन शहरांच्या सुरक्षा व्यवस्थेलाही या कॅमेऱ्यांमधील चित्रीकरणाच्या नोंदीचे बळ मिळू शकते अशा स्वरूपाचा प्रस्ताव पोलीस आणि महापालिकेकडून पुढे आणण्यात आला होता. त्यानुसार तळोजा आणि महापे औद्योगिक पट्ट्यातील कंट्रोल आणि कमांड केंद्रात यापुढे नवी मुंबई पोलीस तसेच पनवेल महापालिकेला क्सेस देण्याचा निर्णय एमआयडीसीने घेतला आहे.

लगतच्या शहरांनाही त्याचा उपयोग व्हावा यासाठी हा प्रस्ताव मान्य करण्यात आला आहे, अशी माहिती एमआयडीसीतील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

### विमानतळामुळे विकासाला वाव

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि त्यालगत उभ्या राहाणाऱ्या वेगवेगळ्या प्रकल्पांपासून तळोजा औद्योगिक परिसर फारसा लांब नाही. त्यानुसार तळोजा औद्योगिक क्षेत्र हे स्मार्ट औद्योगिक क्षेत्र म्हणून विकसित करण्यास प्रशासनाने यापूर्वीच मंजुरी दिली आहे. त्यानुसार आतापर्यंत ४५० कोटी रुपयांच्या वेगवेगळ्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे.

# दहाव्या मजल्यावरून उडी मारून तरुणीची आत्महत्या

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा येथे एका १९ वर्षीय तरुणीने इमारतीच्या १०व्या मजल्यावरील 'रिफ्युज एरिया'मधून उडी मारली असल्याची घटना घडली आहे. यामध्ये तिचा मृत्यू झाला आहे. ही घटना दुपारच्या सुमारास घडली असून, ती तिच्या पालकांसोबत याच इमारतीत राहत होती.

मृत तरुणी ही पनवेलमध्ये हॉटेल मॅनेजमेंटचा अभ्यास करत होती आणि ती तिच्या पालकांसोबत इमारतीच्या ११व्या मजल्यावर राहत होती. घटनेच्या दिवशी, ती घरी एकटीच होती. तिचे वडील कामावर गेले होते आणि तिची आई साताऱ्याला तिच्या आईला भेटायला गेली होती. दुपारच्या सुमारास इमारतीमधील एका रहिवाशाने तळोजा पोलिसांना या घटनेबद्दल माहिती दिली. तिला तातडीने रुग्णालयात नेण्यात आले, परंतु डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. तळोजा पोलीस ठाण्याचे पीआय सागर निकम यांनी माहिती दिली की, प्राथमिकदृष्ट्या या प्रकरणी अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# सिफेरर्स युनियन भाजप कामगार संघाशी संलग्न

**पनवेल : वार्ताहर**

ऑल इंडिया सिफेरर्स अँड जनरल वर्कर्स युनियन ही भाजपप्रणित श्रम भारतीय जनता कामगार संघाशी संलग्न झाली आहे.



भाजप सरचिटणीस आमदार संजय केनेकर, राज्यमंत्री व श्रम भारतीय जनता कामगार महासंघाचे अध्यक्ष गणेश ताठे यांच्या माध्यमातून ऑल इंडिया सिफेरर्स अँड जनरल वर्कर्स युनियन ही भाजपप्रणित श्रम भारतीय जनता कामगार संघाला संलग्न करण्यात आली आहे. त्याचे पत्र अध्यक्ष संजय पवार यांनी अध्यक्ष गणेशभाऊ ताठे, कार्याध्यक्ष डॉ अमित भोसले , सरचिटणीस अमितदादा कदम यांच्या उपस्थितीत दिले.

# इनरव्हील क्लब ऑफ पनवेलतर्फे बालग्राममध्ये दिवाळी फराळ वाटप; चित्रकला स्पर्धाही रंगली



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिवाळी सणाच्या औचित्याने इनरव्हील क्लब ऑफ पनवेल तर्फे खांदा कॉलनी येथील बालग्राम अनाथालय येथे दिवाळी फराळ वाटप व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून अनाथालयातील मुलांसोबत दिवाळीचा आनंद उत्साहात साजरा करण्यात आला.

या वेळी मुलांना पारंपरिक दिवाळी फराळ चकली, चिवडा, शंकरपाळे आणि मोतीचूर लाडू यांचे वाटप करण्यात आले. फराळ स्वीकारताना मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेले आनंदी हास्य हेच दिवाळीचे खरे सौंदर्य ठरले. तसेच, मुलांच्या कल्पनाशक्तीला व सृजनशीलतेला वाव देण्यासाठी चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत मुलांनी विविध रंगांच्या माध्यमातून दिवाळीचे तेजस्वी चित्रण करत सणाचा आनंद अधिक खुलवला.

या उपक्रमातून मुलांच्या मनात आनंद, आपुलकी आणि सणाचा उत्साह जागवण्यात यश आले. दिवाळीचा खरा अर्थ माणुसकी जपणे आणि आनंद पसरवणे हा आहे त्यामुळे या उपक्रमातून सामाजिक जाणिव अधिक दृढ झाली..






**पनवेल : दैनिक महासागर दिवाळी अंकाचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी दैनिक महासागर रायगड महाव्यवस्थापक व पत्रकार दत्तात्रय कुलकर्णी, विजय कडू, गणेश कोळी, संजय कदम, सुमंत नलावडे, प्रवीण मोहोकर, राजू गाडे, चंद्रकांत शिर्के, विशाल सावंत आदी उपस्थित होते.**

# छटपूजेदरम्यान सायबर सुरक्षेबाबत जनजागृती

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील कानपोली व कोन गाव येथे छटपूजा कार्यक्रमात सायबर सुरक्षा बाबत जनजागृती अभियान वपोनि गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आले.

यावेळी उपस्थिती नागरिकांना अनोळखी व्यक्तीस ओटीपी शेअर करू नका, अनोळखी लिंक ओपन करू नका, डिजिटल अरेस्ट हा फसवणुकीचा प्रकार असल्याने घाबरून जाऊ नका, पोलीस ठाण्याची संपर्क करा, शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक खात्रीशीर करा, अनोळखी व्यक्तीस आपली माहिती शेअर करू नका, दुप्पट पैसे, डिस्काउंट, पटकन लोन, यासारख्या लोभाला बळी पडू नका, सायबर फसवणुकीचे तत्काळ मदती करता १९३०/१९४५ डायल करा, तसेच पोलीस मदतीसाठी ११२ Dial करा अश्या सुचना करण्यात आल्या. या वेळी छटपूजा कार्यक्रमाचे पदाधिकारी, महिला व पुरुष उपस्थित होते.




# अमरदीप बाल विकास फाउंडेशनतर्फे दीपोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आदिवासी हे जंगल, जल व जमीन जतन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत असतात. त्यामुळे त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी अमरदीप बाल विकास फाउंडेशन, पनवेल यांनी हा दीपोत्सवाचा स्तुत्य उपक्रम आयोजित केला होता.

दिवाळी फराळासोबतच आदिवासींना गीत संगीताची मेजवानी तसेच आदिवासी बांधवांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी टी. एम.जी.प्रस्तुत संगीताच्या मेजवानीचा कार्यक्रम देखील आखला आहे. हे खरोखरच कौतुकास्पद आहे. असे भावपूर्ण उदगार कोकण विभागाच्या विशेष प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे यांनी काढले. मुंबई-कोकण महामार्गावरील कर्नाळा पक्षी अभयारण्याजवळील युसुफ मेहर अली सेंटरच्या मागील कल्हे ग्रामपंचायतीच्या हद्दीतील लहुजी वाडीतील राममंदिरात शनिवारी



झालेल्या कार्यक्रमामध्ये त्या बोलत होत्या.

त्या पुढे म्हणाल्या, आदिवासी बांधवांसाठी अनेक सरकारी योजना शासन राबवत आहे. आदिवासी बंधू-भगिनींनी या योजनांचा जरूर लाभ घेऊन आपला शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व सर्वांगीण विकास साधावा. शासन नियमाच्या चौकटीत राहून सर्व प्रकारच्या सहकार्यास आपण तयार असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

निसर्गरम्य परिसरात ऊन-पावसाच्या साक्षीने झालेल्या या कार्यक्रमात मुंबई,ठाणे व पनवेल परिसरातील नामवंत गायकांनी हजेरी लावली. तसेच मुंबई, पुणे व पनवेल परिसरातील ४०-४५ मान्यवर मंडळींनी कार्यक्रमास आवर्जून हजेरी लावली. आदिवासी बांधवांना फराळ व त्यांच्या मुलांना चॉकलेट- बिस्किट वाटप झाल्यानंतर या सुमधुर कार्यक्रमाची सांगता झाली. आदिवासी बांधवांनी कार्यक्रमाचा परिसर स्वच्छ करून सुंदर रांगोळ्यानी सजवला होता तसेच मंदिराच्या सभामंडपात आकाश कंदील व फुग्यांची रम्य सजावट केली होती.

कार्यक्रमाचे प्रास्तविक संस्थेचे सर्वेसर्वा एन.डी.खान यांनी केले. या कार्यक्रमास ज्यांचे विशेष सहकार्य लाभले,ते सामाजिक कार्यकर्ते रत्नाकर घरत यांनी कार्यक्रमाचा उद्देश प्रेक्षकांना समजावून सांगितला. कार्यक्रमाच्या आयोजक सलमा खान होत्या. तर समन्वयक डॉ. विजय मोरे व राजकुमार ताकमोगे हे होते. लखुजी जाधव यांचे वंशज श्रीमंत श्रीमंत संभाजीराजेजाधव, माजी सहाय्यक आयुक्त शंकर बिराजदार, जीवन प्राधिकरणाचे उप अभियंता शैलेंद्र अक्कलकोटे हे मान्यवर उपस्थित होते.

मीना ताकमोगे व आदिवासी बंधू-भगिनी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी खास परिश्रम घेतले. लोकगौरव राष्ट्रीय एकात्मता परिषद व महाराष्ट्र राज्य लोककल्याणकारी सेवा संस्था यांचे विशेष सहकार्य लाभले.

## संपादकीय

# विरोधकांकडून दिशाभूल

एकीकडे राज्यातील महायुतीचे सरकार अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांपर्यंत मदतनिधी पोहचवण्याच्या कामात गुंतलेले आहे. तर दुसरीकडे आगामी निवडणुकांवर डोळा ठेवून लोकांची दिशाभूल करण्याच्या प्रयत्नात राज्यातील विरोधी पक्षांचे नेते सध्या व्यस्त दिसतात. लोकांच्या प्रश्नांविषयी त्यांना काहीही देणेघेणे असलेले दिसत नाही.

**अतिवृष्टीने राज्यातील शेतकऱ्यांचे जग होत्याचे नव्हते करून टाकले. या नैसर्गिक संकटाने हबकून गेलेल्या बळीराजाला आधार देण्यासाठी महायुती सरकारने तातडीने पावले उचलली. राज्यभरातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांमध्ये आतापर्यंत आठ हजार कोटी रूपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. वितरित केलेले हे पैसे आतापर्यंत सुमारे ४० लाख शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले आहेत. राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी पार पडलेल्या बैठकीत अतिवृष्टीग्रस्तांसाठी आणखी ११ हजार कोटी रूपये वितरित करण्यास मंजुरी देण्यात आली. हा अतिरिक्त मदतनिधी येत्या पंधरा दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल अशी अपेक्षा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीत अतिवृष्टीग्रस्तांसाठीच्या मदत पॅकेजचा आढावा घेतला. निधीची कोणतीही कमतरता नाही हेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. आतापर्यंत वाटप झालेला मदतनिधी वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये वेगवेगळ्या पद्धतीने गेला आहे. काही ठिकाणी काहींच्या नोंदी, बँक खाती आदींमध्ये अडचणी आहेत. त्या दूर करण्याचा आटोकाट प्रयत्न महायुती सरकारकडून केला जातो आहे. येत्या पंधरा-वीस दिवसांत ९० टक्के शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा होतील असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. प्रक्रिया पूर्ण करताना याद्या दोन वेळा तपासाव्या लागत आहेत. कोणीही पात्र शेतकरी मदतनिधीविना राहून जाऊ नये यावर महायुती सरकारचा भर आहे. त्याचवेळी कुणाही अपात्र व्यक्तींच्या हाती अकारण मदतनिधी जाता कामा नये याचीही दक्षता घ्यावी लागते आहे. शेतमालाच्या खरेदीसाठी नोंदणी करून शासकीय खरेदी केंद्रांवर किंवा सरकारने जाहीर केलेल्या हमीभावाप्रमाणे खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांनाच मालाची विक्री करण्याचे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले आहे. एकीकडे सत्ताधारी महायुती अशातऱ्हेने जनतेच्या खऱ्याखुऱ्या प्रश्नांच्या सोडवणुकीत गुंतलेली असताना विरोधक मात्र निव्वळ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांवर डोळा ठेवून राज्यात हजारो बोगस मतदार असल्याची आवई उठवण्यात मग्न आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांनी यापूर्वीच म्हटल्याप्रमाणे पुन्हा पराभव होण्याच्या भीतीने विरोधक कधी नव्हे इतके गोंधळून गेलेले दिसताहेत. त्यामुळेच विरोधीपक्षांतील काही नेते तर वाट्टेल ते बरळत सुटले आहेत. उबाठा सेनेचे नेते उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या पक्षाच्या अलीकडच्या सभेत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा उल्लेख करताना 'हा नाकोंडा मुंबईला गिळायला आला आहे' असे विधान केले. या अशा बेलगाम वक्तव्यांमधून काय साध्य होते? गेली तीन दशके मुंबई महापालिकेत असलेली सत्ता गमावण्याच्या भीतीने या पक्षातील नेतेमंडळी हवालदिल झालेली आहेत एवढेच त्यातून दिसते. तीस वर्षांच्या सत्ताकाळात उबाठा सेनेने आंतरराष्ट्रीय शहर गणल्या जाणाऱ्या मुंबईचा काय कायापालट केला? मुंबईला सोन्याची अंडी देणारी कोंबडी समजून कोट्यवधी रुपयांची कमाई कुणी केली ते मुंबईकर जनता जाणून आहे. राज्यात सत्तेवर असतानाही कुणी काय दर्जाची कार्यक्षमता दाखवली हेही जनता विसरलेली नाही. महायुती सरकार अत्यावश्यक कामांमध्ये गुंतलेले असताना जनतेची दिशाभूल करण्याचे काम तेवढे विरोधक करत आहेत हे ओळखून जनता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांमध्ये योग्य त्या बाजूनेच कौल देईल हे निश्चित आहे.**

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी शासन-प्रशासन सरसावले



पोलादपूरसह रायगड जिल्ह्यात आणि कोकणात पावसाने मे महिन्यापासूनच अवकाळी मान्सूनपूर्व पाऊस म्हणून हजेरी लावून स्थिरावण्याचे धोरण स्वीकारले अन् शेतकरीराजाची अवस्था दाद मागायचीही गरज राहणार नाही अशी झाली. शेताची मशागत करण्यापूर्वीच पावसाची हजेरी शेतकरीराजाला पावसापूर्वी पारंपरिक बियाणे प्रक्रिया करून उन्हात सुकवायची संधीही न देणारी ठरली. त्यामुळे स्थानिक मंत्री गोगावले यांच्या वाढदिवसानिमित्त मिळालेले भातबियाणे घेण्यासाठी तालुक्यातील ५००हून अधिक शेतकरी रांग लावून उभा राहिला. नांगरणी झाली आणि नियमित मान्सूनची हजेरी झाली. शेतात खलाटीत पाणी साचल्याने चिखलणीदेखील करता आली.

पावसाने अनेकदा अतिवृष्टीचा जोर धरला आणि भाताचा पेरा तरीही तगला. दुबार पेरणीची वेळ निसर्गानेच आणली नाही म्हणून शेतकरी सुखावला. गादी वाफ्यातून आवणे रूजली आणि लावणीसाठी रोपे वाढली, मात्र कोकणातील शेती हा पावसावरील जुगार असल्याने शेतकऱ्यांना पिकविमा संरक्षणाद्वारे आश्वासित करण्याचा प्रयत्न तालुका कृषी अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत सुरू झाला. प्रधानमंत्री पीक विमा योजना ही कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकरी यांचेसाठी ऐच्छिक आहे. योजनांतर्गत नोंदणीसाठी शेतकरी यांना दोन टक्के विमा हप्ता भरणे आवश्यक आहे आणि जोखीम स्तर ७० टक्के असा निश्चित करण्यात आला आहे. मृत शेतकरी किंवा अवैध मार्गाने काढलेला विमा अर्ज रद्द करण्यात येणार आहे. योजनेत सहभागासाठी शेतकरी यांना शेतकरी ओळखपत्र क्रमांक (ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी) असणे अत्यंत आवश्यक आहे तसेच शेतकरी यांना ई-पीक पहाणी अंतर्गत पिकाची नोंद करणे बंधनकारक आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेत खरीप हंगामामध्ये पीक पेरणीपासून काढणीपर्यंतच्या कालावधीत विविध नैसर्गिक आपत्ती किंवा पीक उत्पादनावर विपरीत परिणाम करणाऱ्या इतर बाबींमुळे हंगामाच्या शेवटी, पीक कापणी प्रयोग आधारे तसेच तांत्रिक उत्पादन आधारे सदर महसूल मंडळामध्ये पिकाच्या उंबरठा उत्पादनाच्या तुलनेत येणारी घट गृहीत धरून नुकसानभरपाई देय असणार आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेमध्ये भात व नाचणी पिकांचा खरीप हंगामामध्ये समावेश आहे. योजनेमध्ये समावेश होणेसाठी ३१ जुलै २०२५पर्यंत अखेरची मुदत असल्याचे सांगून अधिकाधिक शेतकऱ्यांना विमा काढण्यासाठी प्रवृत्त आणि प्रोत्साहित करण्यात आले.

**खबरबात**
**शैलेश पालकर**

भारतीय कृषी विमा कंपनी लि. असे विमा कंपनीचे नाव असून विमा संरक्षण प्रति हेक्टरी (उंबरठा उत्पन्न पातळीपर्यंत) रायगड जिल्ह्यात जोखीम स्तर ७० टक्के भात आणि नाचणी पिकासाठी आहे. भातासाठी विमा संरक्षित रक्कम ६१ हजार रूपये तर नाचणीसाठी ४० हजार रुपये आहे. शेतकरी यांनी भरावयाचा शेतकरी हिस्सा प्रती हेक्टरी भात तांदूळ ०.७५ टक्केनुसार ४५७ रूपये तर नाचणी ०.२५ टक्केनुसार १०० रूपये आहे. पीक विमा योजनेत सहभागी होणेसाठी शेतकरी बांधवांनी आपले सरकार संगणक सेवा केंद्र (सीएससी), आपल्यानजीकची सरकारी अथवा सहकारी बँक तसेच शेतकरी स्वत: आपल्या मोबाईलद्वारे वेबसाइटवरून आपली नोंदणी करुन आपल्या पिकांचा विमा उतरविला. यासाठी शेतकऱ्यांचे आधारकार्ड, बँक पासबुक, शेतीचा पीक नोंदीचा ७१२ उतारा, ८अ खाते उतारा, पीक पेरा स्वयंघोषणापत्र, सामाईक शेती असेल तर इतर हिस्सेदारांचे संमतीपत्र तसेच आपला शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) ही कागदपत्रे जोडण्यासाठी लावणीपश्चात काळात शेतकरी शासकीय कार्यालयांच्या बाहेर गर्दी करताना दिसून येत होता.



पावसाचा जोर कधी कमी तर कधी जास्त झाल्याने रोपांवर कीडरोगांचा प्रादुर्भाव होण्याची परिस्थिती निर्माण झाली. यावेळी शेतकरी गप्पागोष्टी कार्यक्रमामध्ये तज्ज्ञमंडळी आणि शास्त्रज्ञांमार्फत शेतकऱ्यांचे कीडरोगांबाबत प्रबोधन करण्यात आले, मात्र ऊन-पावसाने हवामानात बदल धरल्याने कीडरोगांचा प्रादुर्भाव झाला नाही. सरतेशेवटी पावसाने संततधार संपूर्ण महाराष्ट्रावरच धरली आणि शेतकऱ्यांना हतबल होऊन निसर्गाने मांडलेला शेतीचा विनाश पाहण्याखेरिज गत्यंतर नव्हते.

पोलादपूरचे तहसीलदार कपिल घोरपडे यांनी १५ ऑक्टोबरला तालुक्यात झालेल्या परतीच्या पावसानंतर तालुका कृषी अधिकारी वैशाली फडतरे यांच्यासोबत महाळुंगे गावातील शेतकऱ्याच्या तक्रारीनुसार पीक पंचनामा करण्यासाठी १७ ऑक्टोबर रोजी शेतकऱ्याच्या शेताच्या बांधावर जाऊन पाहणी केली. या वेळी शेतकऱ्यांसमवेत तालुका कृषी कार्यालयाचे आत्मा समन्वयक कपिल पाटील तसेच रवींद्र गुंड व अन्य कृषीसहायक उपस्थित होते. यानंतर संपूर्ण तालुक्यात ग्रामसेवक, कृषी पर्यवेक्षक व सहायक तसेच तलाठी यांच्यामार्फत संयुक्त पंचनामे करण्यासाठी सुरुवात करण्यात आली आहे.

९ ऑक्टोबरच्या शासननिर्णयानुसार २५३ तालुक्यांतील बाधितांना व आपदग्रस्तांना मदत देण्यासाठी विशेष मदत पॅकेज व सवलती लागू करण्यास शासन मान्यता देण्यात आली असून या शासन निर्णयानुसार शेतीपिकाच्या नुकसानीसाठी तीन हेक्टरच्या मर्यादेत जिरायत पिकांसाठी ८५०० रुपये प्रतिहेक्टरी, तीन हेक्टरच्या मर्यादेत आश्वासित सिंचनाखालील बागायत पिके हेक्टरी १७ हजार रुपये, तीन हेक्टरच्या मर्यादेत बहुवार्षिक पिके २२ हजार ५०० रूपये राज्य आपत्ती प्रतिसाद निधीचे दर व निकष असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

कोकणातील रायगड जिल्ह्याच्या सर्व १५ तालुक्यांचा समावेश यादीमध्ये असल्याने पोलादपूर तालुक्यात या शासननिर्णयाचा लाभ शेतकऱ्यांना देण्यासाठी प्रशासनाचे प्रयत्न सुरू आहेत. यानंतरही आगामी काळात शेतकऱ्यांचे अतिवृष्टी आणि अवकाळीबाधित भातपिकाचे संकलन करून शासननिर्धारित हमीभावात भातखरेदी पोलादपूर तालुक्यात मोठ्या प्रमाणात होणार असल्याने पावसाने झोडपले म्हणून दाद मागायचीही गरज राहणार नाही.



## बदलते तंत्रज्ञान



# बनावट कॉल, फसवणुकीला लवकरच लागणार लगाम!



मोबाईल वापरकर्त्यांना अनोळखी क्रमांकावरून येणाऱ्या कॉलमुळे होणाऱ्या फसवणुकीपासून वाचवण्यासाठी दूरसंचार नियामक मंडळ TRAI (ट्राय) आणि दूरसंचार विभाग DoT यांनी मोठा निर्णय घेतला आहे. लवकरच 'कॉलर नेम डिस्प्ले' (Calling Name Presentation - CNAP) ही नवी सुविधा सुरू केली जाणार आहे. यामुळे कॉल करणाऱ्या व्यक्तीचे नाव आता थेट तुमच्या मोबाईल स्क्रीनवर दिसणार आहे.

या नवीन व्यवस्थेमुळे कॉल करणाऱ्या व्यक्तीने आपल्या मोबाईल नंबरसाठी KYC मध्ये जे नाव नोंदवले आहे, तेच नाव स्क्रीनवर दिसेल. यामुळे थर्ड-पार्टी ॲपची गरज भासणार नाही आणि बनावट कॉल तसेच फसवणूक करणाऱ्यांना लगाम घालणे शक्य होईल.

### सेवा डिफॉल्ट स्वरूपात

सुरुवातीला CNAP सेवा ग्राहकांच्या विनंतीनुसार सक्रिय करण्याची चर्चा होती, मात्र DoTच्या सूचनेनुसार आणि ट्रायच्या मान्यतेनंतर ही सुविधा आता डिफॉल्ट स्वरूपात सर्व मोबाईल वापरकर्त्यांसाठी सक्रिय केली जाईल. वापरकर्त्यांना ही सेवा नको असल्यास, ते विनंती करून ती डिॲक्टीव्हेट करू शकतात.

### फक्त यांचे नाव दिसणार नाही...

ज्या ग्राहकांनी CLIR (Calling Line Identification Restriction) सुविधा घेतली आहे, त्यांचे नाव स्क्रीनवर दिसणार नाही. गुप्तचर संस्था, व्हीआयपी आणि विशिष्ट निवडक लोकांना ही सूट दिली जाईल. उडखठ साठी अर्ज करणाऱ्यांची संपूर्ण तपासणी केली जाईल. गेल्या वर्षी मुंबई आणि हरियाणा सर्कलमध्ये या सेवेचे यशस्वी ट्रायल घेण्यात आले होते.

### खासगी ॲपची काय समस्या...

अनेकदा ट्रू कॉलरसारख्या ॲपवर नाव वेगळेच येते आणि बोलणारा व्यक्ती दुसराच असतो. अनेकदा हे लोक कंपन्या किंवा फसवणूक करणारे असतात. त्यामुळे हा नंबर कोणाचा आहे, आपल्या गरजेचा आहे का हे समजत नाही. यामुळे अशा स्पॅम कॉलची कटकट कामाच्या वेळी, गाडीवर असताना मागे लागते. या त्रासापासून मुक्तता होणार नसली तरी त्या नंबरच्या खऱ्या मालकाचे नाव आल्याने युजरना तो कॉल उचलायचा की नाही हे ठरविणे सोपे जाणार आहे.

# भारतीय शास्त्रज्ञ डॉ. होमी जहांगीर भाभा



**निमित्त**

होमी जहांगीर भाभा एक प्रमुख भारतीय शास्त्रज्ञ आणि दूरदर्शी होते, ज्यांनी भारताच्या अणुऊर्जा कार्यक्रमाची कल्पना केली होती. डॉ. होमी जहांगीर भाभा यांनी मार्च १९४४मध्ये मूठभर शास्त्रज्ञांच्या मदतीने अणुऊर्जेवर संशोधन सुरू केले. सतत साखळी प्रतिक्रियांचे ज्ञान नगण्य असताना आणि अणुऊर्जेपासून वीज निर्माण करण्याची कल्पना कोणीही मान्य करायला तयार नव्हते तेव्हा अणुविज्ञानात त्यांनी काम सुरू केले. होमी जहांगीर भाभा यांना 'भारतीय अणुऊर्जा कार्यक्रमाचे शिल्पकार' असेही म्हटले जाते. देश स्वतंत्र झाल्यावर होमी जहांगीर भाभा यांनी जगभरात काम करणाऱ्या भारतीय शास्त्रज्ञांना भारतात परतण्याचे आवाहन केले. त्यांच्या आवाहनाचा परिणाम झाला आणि काही शास्त्रज्ञ भारतात परतले.


डॉ. होमी जहांगीर भाभा यांचा जन्म मुंबईतील एका पारशी कुटुंबात ३० ऑक्टोबर १९०९ रोजी झाला. त्यांचे वडील प्रसिद्ध वकील होते आणि आईही मोठ्या कुटुंबातील होती. डॉ. जहांगीर भाभा लहान असताना ते खूप कमी झोपायचे, पण हा आजार नव्हता तर त्यांच्या कुशाग्र मनामुळे त्यांच्या विचारांचा वेग खूपच वेगवान होता.

मुंबईतील कॅथेड्रल आणि जॉन कॅनन स्कूलमध्ये त्यांनी शिक्षण घेतले. मुंबईतील एल्फिन्स्टन कॉलेज आणि रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समधून त्यानंतर बीएस्सी पास झाले. मुंबईतून शिक्षण पूर्ण केल्यानंतर भाभा इंग्लंडमधील केम्ब्रिज येथील कैयस कॉलेजमध्ये १९२७ साली अभियांत्रिकीचे शिक्षण घेण्यासाठी गेले. केंब्रिज विद्यापीठात राहून त्यांनी १९३०मध्ये बॅचलर पदवी व १९३४मध्ये डॉक्टरेटही मिळवली. जर्मनीमध्ये वैश्विक किरणांवर त्यांनी अभ्यास, प्रयोग केले.

१९३९मध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाल्यावर होमी भारतात परतले. डॉ. भाभा यांनी तोपर्यंत खूप प्रसिद्धी मिळवली होती. ते इंडियन स्कूल ऑफ सायन्स, बंगळुरू येथे यादरम्यान दाखल झाले आणि १९४०मध्ये रीडर म्हणून त्यांची नियुक्ती झाली. त्यांनी इथून एका नव्या प्रवासाला सुरुवात केली. त्यानंतर शेवटच्या क्षणापर्यंत ते देशाच्या विज्ञान सेवेत मग्न होते. त्यांनी इंडियन स्कूल ऑफ सायन्स बंगळुरूमध्ये वैश्विक किरणांच्या शोधासाठी स्वतंत्र विभाग स्थापन केला.

वयाच्या ३१व्या वर्षी १९४१मध्ये डॉ. भाभा यांची रॉयल सोसायटीचे सदस्य म्हणून निवड झाली. १९४४मध्ये त्यांना प्राध्यापक बनवण्यात आले. इंडियन स्कूल ऑफ सायन्सचे अध्यक्ष आणि नोबेल पारितोषिक विजेते प्रा. उत रमण यांच्यावर भाभा यांचा खूप प्रभाव होता. जेआरडी टाटा यांच्या मदतीने त्यांनी मुंबईत टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्चची स्थापना केली आणि १९४५ साली ते संचालक झाले. डॉ. भाभा यांनी २४ जानेवारी १९६६ रोजी आंतरराष्ट्रीय परिषदेत शांतता मोहिमेत भाग घेण्यासाठी देश सोडला. ते ज्या बोईंग विमानात प्रवास करीत होते दुर्दैवाने ते कांचन जंघा परिसरात बर्फाच्या वादळात अडकले आणि अपघात झाला आणि या अपघातात त्यांचा मृत्यू झाला. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# रोज वेलची खाण्याचे जबरदस्त फायदे...



पदार्थाची चव वाढवण्यासाठी वेलची सुगंधाचं आणि चवीचं प्रतीक मानलं जातं. हिरवी वेलची जवळजवळ प्रत्येक स्वयंपाकघरात आढळणारा मसाला आहे. याचा वापर आपण पदार्थांची चव आणि सुगंध वाढवण्यासाठी केला जातो. आयुर्वेदानुसार वेलचीमध्ये अँटीऑक्सिडंट्स, अँटीइन्फ्लेमेटरी आणि डिटॉक्सिफायिंग गुणधर्म असतात. जे शरीरातील विषारी द्रव्य बाहेर काढण्यास मदत करतात. पचनसंस्था मजबूत ठेवतात.

प्रसिद्ध योगगुरू हंसा योगेंद्र म्हणतात जर आपण रोज १५ दिवस हिरवी वेलची खाल्ली तर आपल्या शरीरात अनेक बदल आपल्याला पाहायला मिळतील. नियमितपणे हिरवी वेलची खाल्ल्यास आरोग्याला कसा फायदा होतो पाहूया.

✻ वेलचीत अँटीबॅक्टेरियल गुणधर्म असतात जे तोंडाची दुर्गंधी निर्माण करणारे बॅक्टेरिया मारतात. नियमितपणे वेलची खाल्ल्यास श्वास ताजा होण्यास आणि नैसर्गिकरित्या तोंडाची दुर्गंधी कमी होण्यास मदत होईल.

✻ वातावरणातील बदलामुळे सध्या अनेकांना सर्दी-खोकल्यासारख्या आजारांना सामोरे जावे लागत आहे. अशावेळी वेलची खाल्ल्यास फायदेशीर ठरू शकते. वेलची आपल्या छातीतला कफ वितळवण्यास मदत करते. छातीतील रक्तसंचय कमी करते आणि श्वास घेण्यास मदत करते.

✻ वेलचीमुळे पचनक्रियादेखील सुधारते. हा छोटासा मसाला आपली पाचक एंजाइम सक्रिय करतो. जेवणानंतर एक किंवा दोन वेलची चावून खाल्ल्याने गॅस, जडपणा आणि पोटफुगी कमी होण्यास मदत होते. अन्न लवकर पचते आणि पोट हलके वाटते.

✻ वेलची आपल्या हृदयाच्या आरोग्यासाठीदेखील फायदेशीर आहे. वेलचीमध्ये भरपूर प्रमाणात अँटीऑक्सिडंट्स असतात. जे शरीरातून अतिरिक्त पाणी आणि मीठ काढून टाकण्यास मदत करतात. यामुळे रक्तदाब नियंत्रित होण्यास मदत होते.

✻ हंसा योगेंद्र म्हणतात की, जेवल्यानंतर रोज दोन वेलची चावून खाणं चांगले. वेलची पावडर, मध, लिंबू आणि थोडी काळी मिरी पावडर मिसळून आपण त्याचा ज्यूस बनवू शकतो. खोकल्यासाठी हे औषध म्हणून चांगले आहे. तसेच याचा हर्बल चहा पिणेदेखील फायदेशीर ठरु शकते.

# परतीच्या पावसाने शेती पाण्यात; पिकांचे नुकसान

## मुरूड तालुक्यात ५० टक्क्यांपेक्षा जास्त शेतीला फटका; शेतकरी चिंताग्रस्त

**मुरुड : प्रतिनिधी**

परतीच्या पावसानने खारअंबोलीसह, खतिबखार, जोसरांजण, तेलवडे, शीघ्रे , वावडुंगी, माझेरी, डोंगरी,सावली, भागातील भातशेतीचे मोठे नुकसान झाले आहे. ५० टक्क्यांहून अधिक कापलेले भात भुईसपाट झाले असून, मेहनतीचे फळ वाया गेल्याने शेतकरी निराश व हताश झाला आहे.मुरुड तालुक्यात ३९०० हेक्टर क्षेत्रापैकी

३,२१० हेक्टर क्षेत्रांत भातलागवड केली जाते. सुवर्णा, जया सारखे पारंपरिक वाण पेरले जातात. यंदा अनुकूल वातावरण असल्याने चांगले पीक येईल, अशी शक्यता होती, मात्र मागील काही दिवसांपासून पडणाऱ्या सतत पावसामुळे उभे पीक आडवे झाल्याने भात शेतीचे मोठे नुकसान झाले आहे.



पावसामुळे आंब्यांना कोंब फुटतील, अशी भीती व्यक्त होत आहे. पीक विम्याबाबत कृषी विभागाकडून प्रणतप्रधान पीक विमा योजनेत सहभागी होण्याचा वारंवार आवाहन केले जात असले तरी दरवर्षी प्रमाणे यंदाही विम्याचे कवच नाकारले आहे. खरीप हंगामातील भातशेती हे मुख्य आणि महत्वाचे एकच पीक असल्याने अल्प भूधारक असणाऱ्या शेतकरी वर्गाचे आर्थिक गणित बिघडल्याची स्थिती आहे. शासनाने भातशेतीचे तातडीने पंचनामे करून तातडीने आर्थिक मदत करावी अशी समस्त शेतकरी वर्गाकडून मागणी होत आहे. कृषी खात्यामधील अधिकारी फक्त पहाणी करून जात आहेत, परंतु प्रत्यक्षात मदत मिळण्यासाठी कोण प्रयत्न करणार हा शेतकरी बांधवांचा मुख्य प्रश्न आहे. आजसुद्धा मुरूड तालुक्यात सतत पाऊस पडत असल्याने शेतीचे आतोनात नुकसान होत असून संकट समयी सरकारने मदतीचा हात पुढे करावा अशी समस्त शेतकरीवृंदांकडून मागणी होत आहे. मुरूड तालुक्यात २४ ग्रामपंचायती असून यातील १८ ग्रामपंचायत हद्दीत शेतीचे मोठे नुकसान झाल्याचे निदर्शनास येत आहे. उभे पीक आडवे झाल्याने वर्षभराचे कष्ट वाया गेल्याची खंत सतावत आहे

## कर्जतमध्ये एकरी पन्नास हजार रुपये भरपाईची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात यंदा भाताचे पीक चांगले आले होते. मात्र भात पीक तयार झाले आणि गेल्या महिनाभर झालेल्या पावसाने हाता तोंडाशी आलेले भात पीक पाण्यात गेले. तालुक्यातील नव्वद टक्के क्षेत्रातील भाताचे पीक पाण्यात भिजून खराब झाले असून शेतकरी हतबल झाला आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी कर्जत तहसीलदार कार्यालयावर धडक देत एकरी पन्नास हजार रुपये नुकसान भरपाई द्यावी, अशी निवेदनद्वारे मागणी केली.

शेतकरी संघटनेचे बाळू थोरवे, चंद्रकांत मांडे, मनोहर पिंगळे, उत्तम श्रीखंडे, विश्वनाथ घारे, उत्तम शेळके, मयूर पाटील, अशोक थोरवे, वैशाली ठाकरे आदिंनी तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले. या निवेदनात तयार झालेले भाताचे पीक शेतात पडून पाण्यात सडत आहे. भाताची कंपनी करणे अशक्य झाले असून अनेक ठिकाणी पिकाचे पूर्ण नुकसान झाले आहे. एकूण सहा



हजार हेक्टर पैकी पाच हजार तीनशे हेक्टर भात शेतीचे नुकसान झल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. त्यामुळे सरकारकडून तातडीची मदत मिळावी. अशी मागणी करण्यात येत आहे.

तहसीलदार डॉ. जाधव यांनी आतापर्यंत पाच हजार २६५ शेतकऱ्यांच्या पिकाचे पंचनामे पूर्ण झाले आहेत. उर्वरित शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे सुद्धा युद्धपातळीवर करण्यात येतील, असे स्पष्ट केले. तहसीलदार डॉ. जाधव यांनी आज तातडीने पंचायत समिती गट विकास अधिकारी सुशांत पाटील आणि तालुका कृषी अधिकारी राजाराम शिंदे यांना बोलवून त्यांच्या बरोबर बैठक घेऊन झालेल्या नुकसानीचे पंचनामे करावेत तसेच नव्याने झालेल्या नुकसानीचे तातडीनेसुद्धा पंचनामे करावेत, अशा सूचना दिल्या.

## शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी!

### पेण तालुक्यात २२६८ हेक्टर आर क्षेत्रात नुकसान

**पेण : प्रतिनिधी**

परतीच्या पावसाने अक्षरशः पेण तालुक्याला झोडपून काढले आहे, यात उन्ह आणि ढगाळ वातावरणाचा फटका भात शेतीला बसला असून विविध भागातील भात शेतीचे नुकसान झाले आहे.



पेण तालुका कृषी विभागाच्या अहवालानुसार १७१ बाधित गावातील २२६८ हेक्टरआर क्षेत्रात नुकसान झाले असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. हातातोंडाशी आलेले पीक वाया गेल्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आले आहे. पावसात कापणीसाठी तयार झालेल्या भातशेतीचे नुकसान झाले. कोंब आलेले भात पीक, पेंढा भिजल्याने ते कुजत आहे.

हातातोंडाशी आलेले पीक वाया जात असल्याचे स्वतःच्या डोळयाने शेतकऱ्यांना पाहावे लागत असल्याने शेतकरी डोळ्यातून पाणी काढत आहेत. यामुळे शेतकरीराजा आर्थिक संकटात सापडला आहे.

सप्टेंबर महिन्यात भात पीक नुकसानीचे पंचनामे पूर्ण करून नुकसान भरपाई याद्या पोर्टलवर अपलोड करण्यात आल्या आहेत तर ऑक्टोबर महिन्यात शेताचे झालेल्या नुकसानीसाठी पुन्हा पंचनामे सुरू करण्यात आले आहेत. सर्व कृषी अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना पंचनाम्याचे आदेश देण्यात आले आहेत, अशी माहिती पेण तालुका कृषी अधिकारी सागर वाडकर यांनी दिली.

मंडळ कृषी अधिकारी अमित गावडे, उप कृषी अधिकारी जितेंद्र गोसावी, कृषी कर्मचारी यांनी नुकसान झालेल्या भात पिक शेतीची पाहणी करून पंचनामा करण्यात येत आहे तर नुकसानीचे सरसकट पंचनामे करून त्वरित सरकारणे नुकसान भरपाई करावी, अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांकडून येत आहे.

## शेतकऱ्यांना मदत वाटपात अ‍ॅग्रीस्टॅकचा अडसर

**अलिबाग :** अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे बाधित झालेल्या रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने साडेसात कोटींचा निधीही जिल्हा प्रशासनाकडे पाठवला आहे, परंतु अ‍ॅग्रीस्टॅकच्या सक्तीमुळे बाधित शेतकऱ्यांना निधी वितरणात अडचणी येत आहेत.

रायगड जिल्ह्यात एकूण तीन लाख तीन हजार ८४४ खातेदार शेतकरी आहेत. त्यापैकी एक लाख १९ हजार ९५९ खातेदारांनी फार्मर आयडी रजिस्टर केले आहे, त्यामुळे अजूनही जवळपास दोन लाख शेतकऱ्यांचे फार्मर आयडी तयार झालेले नाहीत, ज्या शेतकऱ्यांचे फार्मर आयडी तयार झालेले नाहीत. त्यांना मदत वाटपात अडचणी येत आहेत.

एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीत अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील २३ हजार ३५४ शेतकऱ्यांचे नुकसान झाले. यात सात हजार २६३ हेक्टर क्षेत्रावरी शेतीचे नुकसान झाले. सात कोटी ६४ लाख ४० हजार रुपयांचे मदत अनुदान प्राप्त झाले आहे, मात्र अ‍ॅग्रीस्टॅकची सक्ती हा मदत वाटपातील मोठा अडसर ठरत आहे.

शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यापर्यंत जलद गतीने आणि परिणामकारकरित्या पोहोचविता यावा याकरिता कृषी क्षेत्रासाठी सर्वसमावेशक डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी अ‍ॅग्रीस्टॅक योजना राज्यात राबवण्यात येत आहे. यासाठी खातेदार शेतकऱ्यांचा फार्मर आयडी तयार करणे बंधनकारक आहे, मात्र अनेक शेतकऱ्यांचे फार्मर आयडी तयार झालेले नाहीत. त्यामुळे अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांना निधी वितरीत करण्यात अडचणी येत आहेत.

निधी प्राप्त झाला आहे. पंचनामे करून मदत वाटपासाठी मदत व पुनर्वसन विभागाकडे प्रस्ताव सादर केले आहेत. त्यास दोन दिवसांत मंजूरी मिळेल त्यानंतर मदत वाटपाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होण्यास सुरूवात होईल, पण जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी अ‍ॅग्रीस्टॅक योजनेसाठी नोंदणी केलेली नाही. ज्या शेतकऱ्यांची अ‍ॅग्रीस्टॅकसाठी नोंदणी झालेली नाही, त्यांना मदत वितरण करण्यात अडचणी येणार आहेत, असे रायगडाची निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी सांगितले.

## युवा महोत्सवातील उपक्रमांबाबत ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या अनुषंगाने जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन १२ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत करण्यात येणार असून त्यामध्ये वक्तृत्व, कथालेखन, चित्रकला, लोकनृत्य (गट), लोकगीत (गट), कवितालेखन, नवोपक्रम (विज्ञानदर्शन) असे उपक्रम आहेत. या उपक्रमामध्ये सहभागी होण्याकरिता १५ ते २९ वयोगटातील युवक-युवतींनी तसेच युवा मंडळांनी दि.१० नोव्हेंबर २०२५ सायं.५ वाजेपर्यंत dsoraigad.2009@rediffmail.com, द्वारे ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी, रायगड प्रकाश वाघ यांनी केले आहे.

युवकांचा सर्वांगिण विकास करणे, संस्कृती व परंपरा जतन करणे, युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देणे व राष्ट्रीय एकात्मता वाढिस लागणे यासाठी प्रतिवर्षी राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय भारत सरकार करते. राज्यात २०२५-२६ या वर्षातील राष्ट्रीय युवा महोत्सव विकसित भारत चॅलेंज ट्रॅकचे आयोजन १० ते १२ जानेवारी २०२६ या कालावधीत करण्यात येणार आहे. अधिक माहितीकरिता जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, येथे संपर्क साधावा.

## नागोठण्यात पुजाऱ्याची आत्महत्या

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे बाजारपेठेतील जैन मंदिराचा तरुण पुजारी मयुरकुमार महेशभाई राठवा (वय २३) याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना मंगळवार २८ ऑक्टोबर रोजी दुपारी ३.४५ वाजेच्या सुमारास घडली.

या घटनेची फिर्याद मयत पुजारीची पत्नी पिंकलबेन राठवा (वय २४, मुळ राहणार वालपरी पो. माकणी ता. बरडोली जि. छोटा उदयपूर (गुजरात) सध्या रा. आराधना भवन नागोठणे) हिने नागोठणे पोलिसांना दिली असून याबाबत अधिक तपास नागोठणे पोलिस स्टेशचे प्रभारी अधिकारी सपोनि सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पो. हा. महेश रुईकर करीत आहेत.



दरम्यान, जैन मंदिराचा मुख्य पुजारी आपल्या खासगी कामानिमित्त गेले १५ दिवसांपासून रजेवर होता. त्यामुळे मयत मयुरकुमार राठवा याची तात्पुरता नियुक्ती करण्यात आली होती, अशी माहिती जैन बांधवांकडून मिळाली.

याबाबत नागोठणे पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार नागोठणे बाजारपेठेतील जैन मंदिरा समोरील आराधना भवनच्या तिसऱ्या माळा वरील रूम नं. ३ मध्ये मंगळवार २८ ऑक्टोबर रोजी दुपारी ३.४५ वाजण्याच्या सुमारास मयुरकुमार महेशभाई राठवा वय २३ वर्ष मुळ राहणार वालपरी पो. माकणी ता. बारडोली जि. छोटा उदयपूर (गुजरात) सध्या राहणार आराधना भवन पाहिला माळा नागोठणे याने कोणत्यातरी अज्ञात कारणाने रूममध्ये असलेल्या बेडशीटची साईडपट्टी पंख्याला अडकावून गळफास घेऊन आत्महत्या केली.

घटना घडल्याचे समजताच जवळच राहत असलेले मुस्लिम नागरिक घटनेस्थळी धावून आले त्यानंतर नागोठणे उपसरपंच अकलाख पानसरे, असिफ मुल्ला, हुसेन पठाण, अजहर खान व शराफत कडवेकर यांनी मयत मयुरकुमार राठवा याचे पार्थिव गाडीत टाकले तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातदेखील पार्थिव गाडीतून काढण्यास मदत केली.

## विक्रम साबळे पुरस्काराने सन्मानित

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात आयोजित भव्य समारंभात, खोपोलीचे युवा उद्योजक आणि सामाजिक कार्यकर्ते विक्रम यशवंत साबळे यांना नेहरू युवा केंद्र, बीड (भारत सरकार संलग्न) आणि क्रांती ग्रामविकास संस्था संचालित यांच्या वतीने युवा लोकसंसद जनप्रेरणा शिखर पुरस्कार - २०२५ या बहुमानाने गौरविण्यात आले.

हा सन्मान आयुष्यमान भारत मिशनचे महाराष्ट्र अध्यक्ष डॉ.ओमप्रकाशजी शेट्ये आणि मराठी चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध सर्वपरिचित माहेरची साडी मधील अभिनेत्री अलका कुबल-आठल्ये यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

खोपोलीच्या भूमीतून झळकणारे हे उद्योजक विक्रम यशवंत साबळे हे केवळ व्यावसायिक यशाचे प्रतीक नसून सामाजिक बांधिलकी, नेतृत्वगुण आणि नवयुगाच्या सकारात्मक विचारांचे प्रेरणास्त्रोत आहेत.

विक्रम साबळे यांनी त्यांचे वडील यशवंत साबळे व आजोबा दिवंगत लक्ष्मण साबळे यांचा



सामाजिक कार्याचा वसा पुढेही चालू ठेवला आहे. खोपोली शहराच्या विकासाच्या जडणघडणीत साबळे कुटुंबाचा सिंहाचा वाटा असल्याच बोलले जात आहे.

त्यांचा हा सन्मान अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी दीपस्तंभ ठरो, अशी सदिच्छा काशिनाथ पारथे यांनी व्यक्त केली आहे.

## कोरल वाडीवर पोहचणार पाणी

**मोहोपाडा, रसायनी :** सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, अध्यक्ष ग्रामविकास संवर्धन सामाजिक संस्था यांच्या नेतृत्वाखाली आयोजीत करण्यात आलेल्या आमरण उपोषणाच्या बैठकीमध्ये आपटा ग्रामपंचायत हद्दीतील जल जीवन मिशन योजनेतील पाणी पुरवठा योजनेंतर्गत असलेल्या कोरल वाडी आणि इतर वाड्यांच्या पाईप लाईनचे काम पुढील चार दिवसांत पूर्ण करून देण्याचे आश्वासन पाणीपुरवठा विभागाचे उप अभियंता पनवेल यांनी केले. ४/११/२०२५ रोजी स्वतः उप विभागीय अधिकारी पवन चांडक यांच्या हस्ते त्याचे लोकार्पण होणार आहे.

या बैठकीस उपअभियंता पाणीपुरवठा विभाग, नायब तहसीलदार पुरवठा विभाग, सामाजिक कार्यकर्ते स्वप्नील भोवड उपस्थित होते. ॲड. राजेंद्र मढवी यांनी सर्वांचे आभार मानले.

माहिती अधिकार कार्यकर्ते काशिनाथ जाधव, दिलीप मोरे, सुभाष मेहतर, सुभाष फडके, वाजिद शेख, रोहित ढमाल, गणेश थोरवे, लाडीवली ग्रामपंचायत सदस्य महेश पाटील, गुरुदास वाघे, संतोष पवार आदी कोरळवाडी, आपटा ग्रामस्थ उपस्थित होते.

## जिल्हास्तरीय लोकशाही दिन

**रायगड :** प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्या अनुषंगाने माहे नोव्हेंबर, २०२५ मधील जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार, ३ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड येथील राजस्व सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.


### जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे पोयंजे, तहसील- पनवेल, जिल्हा- रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार सौ. वैशाली गजानन भोईर व श्री अतुल बिभीषणराव शिनगारे, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:-

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे पोयंजे, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील,**

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र | | | आकार |
|---|---|---|---|---|---|
| | | लावणी लायक | पोटखराबा | एकुण क्षेत्र | |
| | | हे. आर. प्रती | हे.आर.प्रती | हे.आर.प्रती | रू. पै |
| १७४ | १ | १-०९-८० | ०-१६-७० | १-२६-५० पैकी विक्रीदार यांच्या मालकीचे क्षेत्र ०-२१-५० | ३.५० |

वरील शेतजमीन/मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : २९/१०/२०२५**

**कार्यालयीन पत्ता**
**शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका कॉम्पलेक्स तहसिदार ऑफिस जवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६**
**संपर्क :- ८८८८२७१७५९**

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं जाधव**
**बी.ए.एल.एल.बी.**
**( खरेदीदारचे वकिल)**



### खालापूर नगरपंचायत

**मु.पो.ता.खालापूर, जि. रायगड**
**स्थापना - २६ जून २०१५**
**दुरध्वनी क्र. ०२१९२-२७५०१५ पिन नं.४१०२०२**
**ई-मेल आयडी cokmckhalapur@gmail.com**

**जाहीर सुचना**

**(महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ११८ व ११९ (१) अन्वये)**

खालापूर नगरपंचायत हद्दीतील सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते कि, महाराष्ट्र नगरपंचायत, नगरपंचायती औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १२४ नुसार वर्ष २०२५-२६ ते २०२८-२९ या चतुर्थ वर्षाकरिता नगरपंचायत तर्फे सर्व मालमत्तांचे कर मूल्यनिर्धारण करण्यात आले आहे. कर निर्धारण याद्या प्राधिकृत कर मूल्य निर्धारण अधिकारी रायगड यांनी तपासून कलम ११८ अन्वये प्रसिद्धी करण्याकरिता मंजुरी दिली आहे. मालमत्ता कर आकारणीच्या प्रारूप याद्या कर विभाग नगरपंचायत कार्यालय खालापूर येथे कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) अवलोकनार्थ ठेवण्यात आलेल्या असून या याद्यांमध्ये समाविष्ठ असलेल्या मालमत्ता संदर्भात मालक किंवा भोगवटादार आपण असा हक्क सांगणाऱ्या प्रत्येक व्यक्ती अथवा त्याचे प्रतिनिधीस सदर प्रारूप यादी पाहण्यासाठी विनामुल्य उपलब्ध करण्यात आलेली आहे.

सदरील प्रसिद्ध केलेल्या यादीतील आकारणी बद्दल ज्या कोणाला आक्षेप/हरकत असेल असे हरकती/आक्षेप नगरपरिषदेने उपलब्ध करून दिलेल्या विहित नमुन्यामध्ये मुख्याधिकारी नगरपंचायत खालापूर यांच्या नावाने दिनांक ३०/११/२०२५ सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत कर विभागात सादर करावे. तसेच मालमत्तांच्या मालकी हक्क संदर्भाने काही आक्षेप असलेस किंवा दुरुस्ती असल्यास आवश्यक दस्तऐवज सादर करावेत. कलम ११९ अन्वये सर्व मालमत्ता धारकांना कर आकारणी बाबत वैयक्तिक नोटीस पाठविण्यात येत आहे. ज्या मालमत्ता धारकांना नोटीस मिळाली नसेल त्यांनी कर विभागाशी संपर्क साधून नोटीस प्राप्त करून घ्याव्यात. नोटीस नुसार आक्षेप/हरकत घेण्याची अंतिम मुदत दिनांक ३०/११/२०२५ मायंकाळी ५.३० वाजेपर्यंत असून या मुदतीनंतर आलेले आक्षेप / हरकती स्वीकारण्यात येणार नाही याची नोंद संबधितांनी घ्यावी.

**टीप :-** १) हरकती अर्ज नगरपंचायत कार्यालयात पोहचल्याबद्दल लेखी पोच घेणे जरुरी आहे. पाठवलेला अर्ज नगरपंचायत कडे न पोहचल्यास त्याची जबाबदारी नगरपंचायतवर राहणार नाही.

२) ज्या मालमत्तेच्या आकारणी बाबत तक्रारी अर्ज करावयाचा असेल त्या मालमत्तेचा अनुक्रमांक/सि.स.नं अथवा ७/१२ उतारा फ्लॉट नंबर व ठिकाण तसेच नगरपालिकेने ठरविलेले करयोग्य मूल्य वगैरे माहिती अर्जात जरूर असावयास पाहिजे.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत खालापूर**

**न.पंखा/जाहिरात/५४३/२०२५-२०२६**



### ग्रामपंचायत पळस्पे ता. पनवेल, जि.रायगड

**निविदा सुचना**

दि. : २९/१०/२०२५

ग्रामपंचायत पळस्पे यांजकडून जाहीर सुचना कळविण्यात येते की, ग्रामपंचायत पळस्पे हद्दीतील भटक्या व मोकाट कुत्र्यांसाठी आश्रय स्थान उभारणे. भटके व मोकाट कुत्रे पकडणे तसेच भटक्या व मोकाट कुत्र्यांचे आश्रय स्थानामध्ये देखभाल पोषण लसिकरण निर्बिजीकरण करणे करीता स्थानिक प्रशासन भारतीय प्राणीमंडळ यांचे पाणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत मान्यता प्राप्त संस्था / एन जीओ यांच्या कडुन निविदा मागविण्यात येत आहेत. तरी इच्छूक अधिकृत प्राणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत मान्यता प्राप्त संस्था / एन जीओ यांचे कडुन निविदा मागविण्यात येत आहेत. तरी अधिकृत अनुभुवी संस्था यांनी आपल्या निविदा ग्रामपंचायत पळस्पे येथे दि.०५/११/२०२५ रोजी दुपारी ०२:०० वाजेपर्यंत सादर करण्यात आलेल्या निविदा त्याच दिवशी उघडल्या जातील.

उघडलेल्या निविदा स्विकारणे किंवा नाकारणे याचा अधिकार मा.सपरंच ग्रामपंचायत पळस्पे यांचा राहील.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | इसारा रक्कम१% | निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख | निविदा उघडण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत पळस्पे हद्दीतील भटक्या कुत्र्यांसाठी आश्रय स्थान उभारणे | Animal welfare board of india यांनी निश्चित केलेले दर (प्रति श्वान) | ३०००.०० | दि.०५/११/२०२५ | दि.०५/११/२०२५ |

**अटी व शर्ती**

१. स्थानिक प्रशासन भारतीय प्राणी मंडळ यांचे प्राणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत संस्था यांनीच निविदा सादर करावी.
२. सदर कामाची निविदा भरतेवेळी इच्छुक कंत्राटदाराने संपूणे कामाची माहिती घेवून निविदा सादर करावी.
३. ग्रामपंचायत हद्दीतील भटकी व बेवारस कुत्री पकडून त्याची देखभाल करण्याची जबाबदारी ही ठेकेदाराची राहिल
४. डॉग केनल मधील मोकाट असलेल्या कुत्र्यांची संपूर्ण जवाबदारी, जेवणाची व औषधोपचाराची व्यवस्था करणे हे ठेकेदावर बंधनकारक राहिल
५. डॉग केनल मधील मोकाट, बेवारस कुत्र्यांचे संगोपन व इतर व्यवस्था तसेच कालावधीनंतर पकडण्यात आलेली कुत्री सोडण्याची जबाबदारी ही ठेकेदाराची राहिल.
६. डॉग केनल मधील कुत्र्यांची संख्या GPS व्दारे सादर करणे ठेकेदाराची जबाबदारी राहिल.
७. Ministry of fisheries, animal husbandry and dairying यांचे कडुन दिनांक ३०/०३/२०२३ रोजी जारी करण्यात आलेले Animal birth control rules २०२३ च्या निमनाचे पालन करणे बंधनकारक राहिल
८. स्थानिक संनियत्रंण समिती यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर देयके अदा करणेत येतील.
९ . वरील निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**श्री. सुदिन धनाजी पाटील**
**ग्रामपंचयात अधिकारी**
**ग्रामपंचायत पळस्पे**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**श्रीमती मिनल जनार्दन कनोजे**
**प्रशासक**
**ग्रामपंचायत पळस्पे**
**ता. पनवेल, जि. रायगड**

# डॉलरचे आमिष दाखवून फसवणारे जेरबंद

## तीन गुन्ह्यांची उकल करण्यात यश; रबाळे पोलिसांची कारवाई

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

अमेरिकन चलन असणारे डॉलर स्वस्तात देण्याचे आमिष दाखवून लाखो रुपयांची फसवणूक करणारी टोळी नवी मुंबई पोलिसांनी जेरबंद केली आहे. त्यांना अटक केल्या नंतरच्या चौकशीत अन्य दोन असे एकूण तीन गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे. सर्व संशयित आरोपी हे झाडखंड राज्यातील आहेत.

स्वस्तात अमेरिकेचे डॉलर देण्याचे आमिष दाखवून तीन लाख रुपयांची फसवणूक केल्या प्रकरणी २३ ऑक्टोबरला नवी मुंबईतील रबाळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. कांदिवली येथे राहणाऱ्या मोहम्मद आफ्रिदी सिद्दीकी या ३३ वर्षीय व्यक्तीची फसवणूक झाली होती. त्याच्या संपर्कात संशयित आरोपी आले असता त्यांनी अमेरिरिकेचे चलन असणारे डॉलर स्वस्तात देण्याचे आमिष दाखवले होते. त्याला बळी पडून सिद्दीकी यांनी ३ लाख रुपये देण्याची तयारी



दर्शवली होती. भारतीय चलन घेत डॉलर देण्यासाठी संशयित आरोपींनी ऐरोली येथे भेटण्याचे ठरवले होते. त्यानुसार संशयित आरोपी आणि फिर्यादी २० तारखेला भेटले.

तीन लाख रुपये घेत डॉलरचे पुडके सिद्दीकी याला देत आरोपींनी घाई असल्याचे दाखवत पळ काढला. सिद्दीकी यांनी कागदात गुंडाळलेले पुडके पहिले असता ते नोटांच्या आकारात कापण्यात आलेले कागद असल्याचे समोर आले. त्यांनी या प्रकरणी रबाळे पोलीस ठाण्यात संबंधित आरोपींच्या विरोधात गुन्हा दाखल केला होता. असे प्रकार वाढत असल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण सावंत यांनी एक पथक स्थापन केले त्यांनी तपास सुरू केला. या तपास पथकाने घटना स्थळाचे पुन्हा बारकाईने निरीक्षक केले तसेच सीसीटीव्ही व तांत्रिक विश्लेषण करीत तपास पुढे नेला. या तपासाला यश आले आणि संशयित आरोपी हे शिळफाटा मुंब्रा ठाणे परिसरात असल्याचे समोर आले. तपास पथकाने तात्काळ सापळा रचून चारही आरोपींना जेरबंद केले.

चौकशीत त्यांची नावे मोहमद राहुल लुकमान शेख उर्फ रफीक (३५) आलमगीर आलम सुखखू शेख, (२७),खोसमुद्दीन मोहम्मद शेख उर्फ येलीम, (२३), रिंकु अबुताहीर शेख, (२६), रोहीम बकसर शेख (३४), अजीजुर रहमान सादिक शेख, (३७) असे आहेत सर्व आरोपी झाडखंड येथील असून सध्या सर्व जण मटका चाळ, कौसा, मुंब्रा येथे राहात होते. या सर्वांना २८ तारखेला अटक करण्यात आलेली आहे, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण सावंत यांनी दिली आहे.

# गाड्यांच्या हेडलाईटच्या उजेडात अंत्यसंस्कार; घणसोलीतील प्रकार

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या घणसोली सेक्टर १६ मधील स्मशानभूमीत वीजपुरवठा खंडित झाल्याने अंत्यसंस्कारासाठी आलेल्या नागरिकांना अंधारातच विधी पार पाडावा लागला. अंत्यविधीच्या वेळी स्मशानात काळोख असल्याने अखेर चारचाकी गाड्यांच्या हेडलाईटच्या उजेडातच अंत्यसंस्काराची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. या प्रकारामुळे उपस्थित नागरिक आणि कुटुंबीयांमध्ये संतापाची लाट पसरली असून, महापालिका प्रशासनाच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.



घणसोली स्मशानभूमीत रात्रीच्या वेळी वीजपुरवठा बंद पडल्याने संपूर्ण परिसर अंधारात बुडाला होता. अंत्यसंस्कारासाठी आलेल्या नातेवाईकांना आणि नागरिकांना मोबाईल फ्लॅशलाइट आणि गाडीच्या हेडलाईटच्या उजेडातच विधी पार पाडावा लागला. यामुळे उपस्थितांना केवळ भावनिक त्रासच नव्हे तर स्मशान परिसरात असुरक्षिततेची भावनाही उपस्थितांमध्ये निर्माण झाली होती.

त्यामुळे स्मशानभूमीसारख्या ठिकाणी विजेची पर्यायी व्यवस्था असणे आवश्यक आहे. हे ठिकाण दिवसरात्र वापरले जाते, त्यामुळे प्रत्येक स्मशानभूमीत विद्युत जनित्राची सुविधा तात्काळ उपलब्ध करून द्यावी. अशी मागणी मनसेकडून करण्यात आली आहे. या घटनेनंतर मनसेचे संदीप गलगुडे यांनी महापालिका हद्दीतील सर्व स्मशानभूमीत कायमस्वरूपी जनरेटर बसवण्याची मागणी नवी मुंबई महापालिकेकडे केली आहे.

# दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त सामूहिक प्रतिज्ञा

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रकानुसार २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्यात येत आहे.

'दक्षता आपली सामायिक जबाबदारी' या संकल्पनेनुसार 'दक्षता जनजागृती सप्ताह' साजरा करण्यात येत असून नवी मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयामध्ये अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या समवेत विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी यांनी मुख्यालयातील ॲम्फीथिएटर येथे भष्टाचार निर्मूलनाची सामुहिक प्रतिज्ञा ग्रहण केली. या वेळी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, उपायुक्त किसनराव पलांडे, डॉ.कैलास गायकवाड व संघरत्ना खिल्लारे, महापालिका सचिव चित्रा



बाविस्कर, अति.शहर अभियंता अरविंद शिंदे, सहा.आरोग्य अधिकारी डॉ.रत्नप्रभा चव्हाण, कार्यकारी अभियंतासुधीर जांभवडेकर इतर अधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांचा दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त शुभेच्छा संदेश अतिक्रमण विभागाचे उपायुक्त डॉ.कैलास गायकवाड यांनी वाचून दाखविला तसेच महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभेच्छा संदेशाचे प्रशासन विभागाचे उपायुक्त किसनराव पलांडे यांनी वाचन केले.

महानगरपालिकेच्या विभाग कार्यालयांसह इतरही कार्यालयांमध्ये दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त सामुहिक प्रतिज्ञा ग्रहण करण्यात आली तसेच जनजागृतीसाठी सर्व ठिकाणी माहितीप्रद फलकही प्रदर्शित करण्यात आले आहेत.

# गौरव दयाळ यांनी जेएनपीए अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली

**उरण : प्रतिनिधी**

जेएनपीए बंदराच्या अध्यक्ष पदी केंद्र सरकारच्या वतीने गौरव दयाळ यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांनी या पदाचा पदभार स्विकारला आहे. देशातील सर्वात मोठ्या महाकाय कंटेनर हाताळणी करणाऱ्या एकमेव बंदराच्या विकासाची धुरा ते पुढील पाच वर्षे हाती घेऊन सांभाळणार आहेत. गौरव दयाळ हे मागील दोन दशकाहून अधिक काळ सार्वजनिक सेवेत मोठ्या जबाबदारीने कार्यरत आहेत.



त्यांनी उत्तर प्रदेश केडरचे वरिष्ठ आयएएस अधिकारी म्हणून काम केले असून त्यांच्याकडे प्रशासन,शहरी परिवर्तन,पायाभूत सुविधा विकास, संकट व्यवस्थापनातील कौशल्य आहे. त्यांनी यापूर्वी गृह आणि दक्षता विभागात सचिव पद व आयोध्येचे विभागीय आयुक्त आणि अनेक ठिकाणच्या जिल्ह्यामध्ये जिल्हा दंडाधिकारी अशा महत्वाच्या पदांवर काम केले आहे.

या आधी संजय सेठी हे जेएनपीए बंदराचे अध्यक्ष होते. त्यांची बदली झाल्यानंतर उपाध्यक्षपदी कार्यरत असलेल्या उन्मेष वाघ यांना प्रभारी अध्यक्ष पदाचा अतिरिक्त भार देण्यात आला होता.

# रसायनी येथून दोन अल्पवयीन मुलींचे अपहरण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा येथे राहणाऱ्या बारा वर्ष वयाच्या दोन मुलींचे अपहरण झाले असून पालकांनी रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार सेबी रोड मोहपाडा येथे राहणाऱ्या दोन अल्पवयीन मुली मोहोपाडा बाजारपेठ येथे गेल्या होत्या, परंतु त्या उशिरा पर्यंत घरी परत न आल्याने पालकांनी नातेवाईक मित्र मंडळी सर्वत्र शोध घेतला, परंतु काहीएक ठावठिकाणा मिळला नाही. त्या अल्पवयीन आहेत या गोष्टीचा फायदा घेवून त्यास फुस लावुन अज्ञात इसमाने त्यांना पळवून नेल्याची तक्रार रसायणी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# मानाच्या पालखी सोहळ्याची दिवाळे कोळीवाड्यात तयारी

**नवी मुंबई : बातमीदार**

वर्षानुवर्षे नवी मुंबईतील दिवाळे कोळीवाड्याने सण उत्सवांसह आपली रूढी परंपरा कायम जपली असून याचे कोळीवाड्याने आपल्या वैभवशाली सौंदर्यात मानाची पालखी दिवाळे कोळीवाड्याची या अंतर्गत पदयात्रेच्या एका नव्या परंपरेला भक्तीमय वातावरणात सुरुवात केली आहे. या सोहळ्याच्या तीन महिने आधीपासून सर्वत्र जय्यत तयारी सुरू झाली आहे. यामुळे संपूर्ण कोळीवाड्यात उत्साहाचे वातावरण आहे.



दरवर्षीप्रमाणे, आई एकविरा युवा पदयात्रा मित्र मंडळ यांच्या वतीने नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला दिवाळे कोळीवाडा ते कार्लागड येथील आई एकविरा देवी मंदिर अशा पदयात्रा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. तर, रविवार ११ जानेवारी ते १४ जानेवारी दरम्यान अवघ्या भक्तीमय वातावरणात हा पायी पालखी सोहळा साजरा होणार आहे. यंदा, या पालखी सोहळ्याचं दुसरं वर्ष असून, सोहळ्यापूर्वी आपल्या परंपरेनुसार मंडळाच्या वतीने गावदेवी मंदिरात आरती करून महिलांच्या हस्ते पावती पूजन व नवीन पदयात्री सदस्यांची नोंदणी करण्यात आली. या वेळी ग्रामस्थ उपस्थित होते.

दरम्यान, चार दिवस साजरा होणारा पदयात्रा सोहळा भक्तीभावाने पार पाडण्यासाठी सर्व दिवाळे ग्रामस्थ एकत्रित येत पालखी प्रस्थानासह मार्गक्रमण व पदयात्रीना राहण्यासह जेवणाची व्यवस्था करण्याची तयारी सुरू केली आहे. विशेष म्हणजे या पदयात्रेला सर्व कोळी बांधव आपली पारंपरिक वेशभूषा करून ब्रास बॅण्डच्या ठेक्यावर ताल धरून सहभागी होणार आहेत. त्यामुळे या पदयात्रेला खऱ्या अर्थी कोळी संस्कृतीचे दर्शन होणार आहे.

पदयात्रांमध्ये जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी झाले पाहिजे, असे मत आई एकविरा युवा पदयात्रा मंडळाचे अध्यक्ष करेश मुंबईकर यांनी व्यक्त केले.

# दीपोत्सव मैफलीस उदंड प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल कल्चरल सेंटर, सूर निरागस हो सांस्कृतिक विकास मंडळ आणि ज्येष्ठ नागरिक संघ, पनवेल या तीन संस्थांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.२६) पनवेलच्या ज्येष्ठ नागरिक संघ सभागृहात दीपोत्सवी संगीत मैफलीचं आयोजन करण्यात आले होते.

यात ओमकार प्रभुघाटे यांनी 'इंद्रायणी काठी.., 'बगळ्यांची माळ फुले.., 'गुंतता हृदय हे.., युवतीमना दारुण रण.. आणि श्रीरंगा कमलाकांता ही नाट्य–भक्ती–भावगीते दमदारपणे सादर केली. तर संपदा माने यांनी 'मी राधिका.., 'मी पुन्हा वनांतरी फिरेन.., 'बोलावा विठ्ठल,.. 'नरवर कृष्णासमान.., 'तुम्हांवर केली मी मर्जी बहाल.. ही नाट्यगीते, अभंग आणि चित्रपटगीते तयारीने सादर केली. याशिवाय या दोघांनी 'प्रथम तुला वंदितो कृपाळा.. हे अष्टविनायक चित्रपटातील युगलगीत आणि ऋणानुबंधांच्या जिथून पडल्या गाठी.. हे देव दीनाघरी धावला या नाटकातलं वसंत देसाई यांनी संगीतबद्ध केलेलं अतिशय लोकप्रिय नाट्यगीत गाऊन वन्स मोअर मिळविला. त्यांना तबला साथ केली ज्येष्ठ तबलावादक रामकृष्ण करंबेळकर यांनी, तर संवादिनी साथ केली वरद सोहनी या अतिशय गुणी व तयारीच्या संवादिनीवादकाने. तसेच पखवाज साथ सूरज गोंधळी आणि तालवाद्य साथ समीर कर्वे यांनी केली.

हाऊसफुल गर्दीत झालेल्या या कार्यक्रमाच्या मध्यांतरानंतर श्रोत्यांच्या आग्रहास्तव वरद सोहनीने हार्मोनियम सोलोही सादर केला. या कार्यक्रमाचे निवेदन दीपक पळसुले यांनी केलं.

# छटपूजेत कळंबोली पोलिसांची सायबर सुरक्षा जनजागृती

**कळंबोली : बातमीदार**

सायबर सुरक्षाबाबत नागरिक व महिलांमध्ये जनजागृती व्हावी यासाठी कळंबोली पोलिसांनी कंबर कसली आहे. समाजातील कोणत्याच नागरिकाच सायबरच्या माध्यमातून नुकसान होऊ नये याकरिता कळंबोली पोलिसांकडून जनजागृती अभियान सर्व क्षेत्रांमध्ये राबविण्यात येत आहे.

याचाच एक भाग म्हणून सद्यस्थितीत सुरू असलेल्या छट पूजानामध्येही मोठ्या प्रमाणावर महिलांचा सहभाग असतो. याचेच योग्य माध्यम समजून कळंबोली पोलिसांनी सायबर सुरक्षा बाबत जनजागृती करणाऱ्या सायबर जनजागृती स्टॉलची निर्मिती छटपूजेच्या ठिकाणी करून नागरिकांमध्ये सायबर सुरक्षा बाबत कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांच्या मार्गदर्शनाखाली जनजागृती करण्यात आली.



या वेळी रोडपाली तलाव येथे सायबर जनजागृती स्टॉल उभारून त्यामध्ये विविध संदेश देणारे बॅनर लावण्यात आले. स्टॉलमध्ये येणाऱ्या नागरिकांना सायबर गुन्ह्यांपासून फसवणूक होऊ नये करिता मार्गदर्शन करून त्यांना पॅम्प्लेट वाटप करण्यात आले. एकूण ५०० पॅम्प्लेट वाटप करण्यात आले. छटपूजा कार्यक्रमात जनजागृती होण्यासाठी रोडपाली तलाव येथे छटपूजा कार्यक्रमादरम्यान स्पीकर द्वारे सतत अनाउन्समेंट करूनछट पूजेमध्ये सहभागी झालेल्या महिला व अन्य नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले.

सायबर सुरक्षा बाबत जनजागृती मोहिमेमध्ये रोडपाली तलाव जवळ अंदाजे ४५०० ते ५००० जनसमुदाय उपस्थित होता.

# लक्ष्मीपूजनाच्या मुहूर्तावर बाजारात दाखल झालेल्या 'हापूस'ला विक्रमी दर

## सहा डझनांच्या पेटीला २५ हजार रुपये

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

लक्ष्मीपूजनाच्या शुभमुहूर्तावर वाशीच्या मुंबई एपीएमसी फळ बाजारात दाखल झालेल्या हापूस आंब्याला विक्रमी दर मिळाला आहे. देवगडवरून आलेल्या हापूस आंब्याच्या सहा डझनांच्या पेटीला तब्बल २५ हजार रुपयांचा भाव मिळाला असून, आजपर्यंत मिळालेल्या दरांपैकी हा दर सर्वाधिक मानला जात आहे.

वाशीतील मुंबई एपीएमसी फळ बाजारात यंदा देवगड तालुक्यातील पडवणे गावचे बागायतदार प्रकाश धोंडू शिर्सेकर यांनी ऑक्टोबर महिन्यात दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर हापूस आंब्याची सहा डझनाची पेटी पाठवली होती. दरवर्षी जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात कोकणातील हापूस आंबा एपीएमसी बाजारात दाखल होतो, मात्र यंदा ऑक्टोबर महिन्यातच



तेही दिवाळीच्या मुहूर्तावर मुंबई एपीएमसी फळ बाजारात कोकणातील 'हापूस' दाखल होणे ही एपीएमसीच्या इतिहासातील पहिलीच घटना ठरली.

या वेळी लक्ष्मीपूजनाच्या दिवशी नानाभाऊ जेजूरकर अँड कंपनी या व्यापाऱ्यांकडे ही पेटी दाखल झाली होती. त्या दिवशी या पेटीची विधिवत पूजा करण्यात आली आणि आंबे पूर्णपणे पिकल्यानंतर विक्रीसाठी ठेवण्यात येतील अशी माहिती व्यापाऱ्यांनी दिली होती. त्यानंतर काही दिवसांनी बोली लावण्यात आली असता, या मुहूर्ताच्या आंब्याच्या पेटीला तब्बल २५ हजारांचा विक्रमी दर मिळाल्याचे व्यापारी हर्षल जेजुरकर यांनी सांगितले. मुंबईतील एका ग्राहकाने ही पेटी खरेदी केली असून, त्याचे नाव व्यापाऱ्यांनी गोपनीय ठेवले आहे. आतापर्यंत हापूस आंब्याच्या पेटीला २० ते २२ हजारांपर्यंत विक्रमी दर मिळाला होता, परंतु यंदा लक्ष्मी पूजनाच्या शुभ मुहूर्तावर आलेल्या हापूसच्या पेटीला २५ हजारांचा दर मिळाल्याने सर्वांकडून आश्चर्य व्यक्त केले जात आहे.


शिर्सेकर यांच्या बागेत जुलै महिन्यातच काही कलमांना आगाऊ मोहोर आला होता. त्या कलमांवर त्यांनी विशेष प्लास्टिक आवरण व फवारणी करून फळधारणा टिकवली. त्यातून तयार झालेल्या आंब्यांपैकी पहिली पेटी दिवाळीपूर्वीच बाजारात पोहचली.

या वर्षी हापूस जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात किंवा फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात बाजारात दाखल होईल, असा अंदाज आंबा व्यापाऱ्यांनी व्यक्त केला आहे. तरी कोकणातून इतक्या लवकर आंबा मुंबईत पोहोचणे ही एक वेगळीच घटना ठरली असून, आंब्याला विक्रमी दर मिळाल्याने बाजारात हापूसची दिवाळी अशीच चर्चा रंगू लागली आहे.



# अवकाळी पावसामुळे भातशेतीचे नुकसान

## तत्काळ पंचनामे करून नुकसानभरपाईची मागणी



**माणगाव : बातमीदार**

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे माणगाव तालुक्यातील शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत. पिकावर येणाऱ्या शेवटच्या टप्प्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे भातशेतीचे प्रचंड नुकसान झाले असून शेतकऱ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरले आहे. हातातोंडाशी आलेला घास जमीनदोस्त झाल्याने अनेक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

माणगाव तालुक्यातील लोणेरे, पन्हळघर, निजामपूर, गोरेगाव, कोलाड, हरवंडी, मूर, देवळी, भिंताड, चिंचवळी, अंबर्ले, नागाव उसरघर, नवघर, रेपोली, भांदरे, न्हावे, खडकोळी, वाघोसे, मांगरुळ, वडपाले, टेंमपाले, पहेल, खांडपाले लाखपाले, नवघर, तळेगाव, हातकेली, गारळ, वडगाव, पन्हळघर बुद्रुक, चाफडी आदी भागात शेतकऱ्यांनी या वर्षी मोठ्या आशेने भात लागवड केली होती, मात्र गेल्या आठवडा भरात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतात पाणी साचून पिके कुजली, धान कोसळले, तसेच बुरशी व कीटकांचा प्रादुर्भाव वाढला आहे. परिणामी शेतकऱ्यांच्या संपूर्ण हंगामाची वाट लागली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी जगावे कसे असा चिंतेचा विषय बनला आहे.

या पार्श्वभूमीवर शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रामदास वारिक यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे शाससनाकडे तत्काळ मदतीची मागणी केली आहे. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. शासनाने या परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई जाहीर करावी, अशी मागणी वारिक यांनी केली.

ते पुढे म्हणाले, शेतकरी आज आर्थिक संकटात आहे. खत, बियाणे, मजुरी, कीटकनाशक यांचा खर्च वाढला असून उत्पादन शून्य झाले आहे. अशा स्थितीत शासनाने तत्काळ निर्णय घेत शेतकऱ्यांना थेट खात्यात मदत द्यावी.

अवकाळी पावसामुळे माणगाव तालुक्यातील अनेक गावांत शेतजमिनी पाण्याखाली गेल्या असून काही ठिकाणी भाताची कणसे पडून गेलेली आहेत. जिल्हा प्रशासनाने नुकसानग्रस्त भागाचे सर्वेक्षण सुरू करावेत. प्रत्यक्ष मदत मिळेपर्यंत शेतकऱ्यांची अवस्था बिकट राहणार असल्याचे चित्र दिसत असल्याने महसूल प्रशासनाने जलदगतीने पंचनामे कोणतेही निकष न लावता पंचनामे करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे सरसकट पंचनामे करण्यासाठी निवेदन



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यात पावसाची अतिवृष्टी होऊन शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. काही ठिकाणी ही पिके पावसात भिजली आहेत, तर शेतामधील उभे पीक पावसामुळे आडवे झाले आहे. त्यामुळे शेतकरीवर्ग मोठ्या अडचणीत सापडला आहे.शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासन तातडीने मदत जाहीर करणारच आहे, परंतु प्रत्येक शेतकऱ्याला ही मदत मिळण्यासाठी सरसकट पंचनामे करून शेतकरीवर्गाला दिलासा द्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे तहसीलदार आदेश डफळ यांच्याकडे शिवसेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

या वेळी शिवसेनेचे रायगड उपजिल्हाप्रमुख भरत बेलोसे व नेते विघ्नेश माळी यांच्या नेतृत्वाखाली बांधकाम कामगार सेनेचे मुरुड तालुका अध्यक्ष दिनेश मिणमिने, युवा सेनेचे उपजिल्हाप्रमुख दीपेश वरणकर, चिटणीस अविनाश शिंदे, उपतालुकाप्रमुख निलेश तांबटकर, तालुकाउपप्रमुख मनोज कमाने, अरविंद गायकर, जावेद कारभारी, वेळास्ते ग्रामपंचायत सरपंच शरद खेडेकर, विशाल पाटील, युवा सेनेचे तालुका संघटक स्वप्नील चव्हाण, नांदगाव उपशाखा प्रमुख जितेंद्र दिवेकर आदी उपस्थित होते.

या वेळी शिवसेनेचे नेते विघ्नेश माळी यांनी तहसीलदार यांच्यासोबत चर्चा करताना, मुरूड तालुक्यात अतिवृष्टीमुळे रस्त्याचे संरक्षक कठडे, डोंगराचा भाग पडू नये म्हणून बांधण्यात आलेली संरक्षक भिंत, शेतीवरचे बांध वाहून गेले आहेत. तेव्हा आपत्कालीन निधी प्राप्त होण्यासाठी शासनाकडून आपला अहवाल पाठवण्यात यावा अशी मागणी केली, तर उपजिल्हाप्रमुख भरत बेलोसे म्हणाले की, पावसाचे प्रमाण वाढले असून आजसुद्धा मुसळधार पावसामुळे शेतकरीवर्ग हवालदिल झाला असून सरसकट पंचनामे करून त्यांना दिलासा देण्यात यावा. आमदार महेंद्र दळवी हे शेतकरीवर्गास तातडीने मदत मिळण्यासाठी राज्य शासनाकडे प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या पाठपुराव्यास यश प्राप्त होणार असून शेतऱ्यांना मोठी आर्थिक मदत प्राप्त होणार आहे. यासाठीच सर्वांचे सरसकट पंचनामे करावे.

याबाबत मुरूड तहसीलदार आदेश डफळ यांनी सांगितले की, जिल्हाधिकारी यांच्याकडून आम्हाला पंचनामे करण्याचे आदेश प्राप्त झाले आहेत. स्थानिक तलाठीवर्गास पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# खोपोलीत छटपूजा उत्साहात



**खोपोली : प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी खोपोलीत छटपूजा मोठ्या उत्साहात झाली. पाताळगंगा नदीवरील विविध घाटांवर छटपूजा करण्यात आली. या वेळी नगरपालिका, स्थानिक सामाजिक संस्थांकडून आवश्यक त्या सोयीसुविधा देण्यात आल्या होत्या.

औद्योगिक नगरी असल्याने खोपोली शहरात उत्तर भारतीय नागरिक कुटुंबासह मोठ्या संख्येने वास्तव्यास आहेत. त्यामुळे येथे छटपूजा मोठ्या प्रमाणावर साजरी करण्यात येते. सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी छटपूजेनिमित्ताने मोठ्या प्रमाणावर शुभेच्छा व विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. प्रत्यक्ष छटपूजा ठिकाणीही उपस्थित राहून त्यांनी शुभेच्छा दिल्या.

# नेरळमध्ये छटपूजेचा उत्साह; गणेश घाटावर सूर्यदेवाला अर्घ्य



**नेरळ : प्रतिनिधी**

कार्तिक महिन्याच्या शुक्ल षष्ठीनिमित्ताने सूर्यदेव आणि छठी मैया यांना अर्पण करण्यात आलेल्या छटपूजेनिमित्त नेरळ शहरात धार्मिक वातावरण निर्माण झाले. छठमाई देवी सामाजिक सेवा संस्था, रायगड नेरळ यांच्या वतीने गणेश घाट परिसरात कृत्रिम तलाव उभारून हा पवित्र कार्यक्रम मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष अमरेंद्र सिंह होते, तर रमाकांत पाठक (उपाध्यक्ष), अजय पांडे (सचिव), नंदलाल प्रजापती (खजिनदार), अंकुश सिंह (उपखजिनदार), मनीष सिंह (उपसचिव) तसेच सल्लागार म्हणून विनोद शुक्ला, अजित तिवारी, शशी भूषण तिवारी, राम चौहान आणि विनोद मोरया यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

२७ ऑक्टोबरपासून सुरू झालेला हा दोन दिवसांचा धार्मिक उत्सव २८ ऑक्टोबर रोजी पहाटे सूर्योदयचे दर्शन घेऊन पूर्ण करण्यात आला. म्हणजेच 'संध्याअर्घ्य' आणि दुसऱ्या दिवशी 'उषाअर्घ्य' देऊन संपन्न झाला.

पूजेच्या निमित्ताने महिलांनी पारंपरिक वस्त्रे परिधान करून सूर्यदेवाला जल अर्पण केले, तर भाविकांनी तलाव किनाऱ्यावर 'छठी मैया'चे भजन व आरती करत परिसर दुमदुमवला.

या छटपूजेला नेरळ शहरातील विविध समाजातील नागरिक, महिला मंडळी तसेच राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.

छटपूजा सणाचे महत्त्व म्हणजे हा उत्तर प्रदेश मध्ये नागरिकांमध्ये चार दिवस चालणारा हा पवित्र सण सूर्यदेव आणि छठी मैया यांच्या उपासनेसाठी समर्पित असून सूर्यदेवाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी केला जातो.

पृथ्वीवरील जीवन, ऊर्जा आणि समृद्धी देणाऱ्या सूर्यदेवाला अर्घ्य देऊन मानव आपल्या जीवनातील सकारात्मकतेचा संदेश या सणाद्वारे देतो.

# परतीच्या पावसाचा भातशेतीबरोबर वीटभट्टी, सुकी मासळीसह अनेक व्यवसायांना फटका



**पाली : प्रतिनिधी**

परतीच्या पावसाचा फटका रायगड जिल्ह्यातील भातशेतीबरोबरच अनेक व्यवसायांना बसला आहे. यंदा जिल्ह्यात मे महिन्यात पाऊस सुरु झाला आणि ऑक्टोबरच्या अखेरीसही कोसळत आहे. त्यामुळे अनेक व्यवसायांना प्रचंड नुकसानीला सामोरे जावे लागत आहे.

पावसाळा लांबल्याने बांधकाम, विकासकामे करणारे, भात गिरणी, वीटभट्टी, कुंभारकाम, सुकी मासळी, मंडप व डेकोरेशन आदी व्यावसायिक हतबल झाले आहेत. त्यांना प्रचंड नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. लांबलेल्या पावसामुळे हे व्यवसाय अक्षरशः डबघाईला आले आहेत. शेतामध्ये भातपिक डोलू लागले होते आणि तयार झालेला भात कापणीसाठी शेतकरीदेखील सज्ज होते. या हंगामात शेतकरी कापणी करून भात गिरण्यांवर भात भरडण्यासाठी गर्दी करतात, मात्र तयार झालेला भात शेतात पाण्यात आडवा पडल्यामुळे आता शेतकऱ्यांचे तर नुकसान झालेच, मात्र भात गिरणी व्यवसायाचेदेखील नुकसान झाले आहे.

**कुंभारकाम व्यवसायावर पाणी**

पालीतील कुंभारकाम व्यवसायिक म्हणाले की, परतीच्या पावसामुळे मडकी, चुली व मातीच्या इतर वस्तू आणि मातीची खेळणी खराब झाली आहेत, शिवाय पाऊस आणि गारवा असल्याने मडकी व चुलींची विक्रीदेखील थांबली आहे. ऐन दिवाळीच्या हंगामात पाऊस असल्यामुळे पणती विक्रीलाही त्याचा फटका बसला. मातीच्या वस्तू भाजण्यासाठी लागणारा पेंढा, लाकडे व कोळसासुद्धा भिजला आहे. त्यामुळे भट्टी लावणे अवघड झाले आहे. माती भिजल्याने ती पुन्हा वापरता येणार नाही. मालाला उठावसुद्धा मिळत नाही. त्यात झालेले नुकसान यामुळे खूप वाताहत होत आहे.

**मंडप व डेकोरेशन व्यवसाय नुकसानीत**

सुधागड तालुक्यातील मंडप व डेकोरेशन व्यवसाईक सखाराम साजेकर म्हणाले की, मे महिन्यात ऐन हंगामात पाऊस सुरु झाल्याने प्रचंड नुकसान झाले, शिवाय कापड, पडदे, इलेक्ट्रिक व डेकोरेशनचे सामान भिजून खराब झाले. सध्या लगीनसराई व सार्वजनिक आणि राजकीय कार्यक्रम सुरू होतील, पण ऐनवेळी कोसळणाऱ्या परतीच्या पावसामुळे काही ऑर्डर रद्द झाल्या आहेत. अचानक पाऊस कोसळत असल्याने धास्ती वाटते, असेदेखील ते म्हणाले.

**बांधकाम व विकसक व्यवसायावर गदा**

जिल्ह्यात बांधकाम व्यवसाय व फार्म हाऊस व इतर विकसक व्यवसाय वाढत चालला आहे. नवनिर्माणाची कामेदेखील काही प्रमाणात होताना दिसत आहेत, मात्र स्लॅब टाकणे, वीट काम करणे, भराव किंवा उत्खनन करणे, रंगकाम करणे आदी कामांना परतीच्या पावसामुळे प्रचंड अडथळा येत आहे. त्यामुळे ही काम पूर्ण होत नाही. पालीतील ग्रीन टच नर्सरीचे मालक अमित निंबाळकर यांनी सांगितले की, विविध ठिकाणी गार्डनिंगची आणि विकसकाची कामे सुरू आहेत, मात्र ऐनवेळी येणाऱ्या परतीच्या पावसामुळे सर्व कामे खोळंबतात आणि नुकसानही होते. मजूरवर्गांना काम मिळत नाही, शिवाय अचानक आलेल्या पावसामुळे काम बंद झाले तरी त्यांना मजुरी द्यावीच लागते.

**वीटभट्टी व्यवसाय संकटात**

वीटभट्टी व्यवसाय हा बांधकाम व्यवसायाचा कणा मानला जातो. त्यामुळे जिल्ह्यात प्रत्येक तालुक्यात वीटभट्टी व्यवसाय रूजला आणि वाढला आहे. दरवर्षी पावसाळा कमी झाल्यावर सर्वच वीटभट्ट्यांवर कामाची लगबग सुरू होते, मात्र यंदा पाऊस खूपच लांबला आहे. यामुळे वीटभट्टी व्यवसाय संकटात सापडला आहे. जिल्ह्यात ठिकठिकाणी लहान-मोठे शेकडो वीटभट्टी व्यवसाय आहेत. कित्येक करोडो रुपयांचा हा उद्योग चालतो. परतीच्या पावसामुळे मात्र या व्यवसायासाठी आवश्यक असणारी पूर्वतयारी करणे अवघड झाले आहे. अनेक शेतात पाणी साचले आहे. त्यामुळे पाणी सुकेपर्यंत तिथे वीटभट्टी सुरू करणे शक्य नाही. असंख्य कच्च्या विटा पावसामुळे खराब झाल्या आहेत. विटा पाडण्यासाठी जमा करून ठेवलेली मातीदेखील पावसामुळे वाहून गेली. विटा भाजण्यासाठी लागणार कोळसा, भाताचा कोंडा किंवा तूसदेखील भिजून खराब झाला आहे. याबरोबरच काही ठिकाणी विटा पाडण्याचे काम सुरू न झाल्याने काही मजुरांना आगाऊ दिलेली रक्कमदेखील वाया गेली. निसर्गाच्या लहरीपणामुळे अशा विविध मार्गाने वीटभट्टी चालक व मालकांचे नुकसान झाले आहे.

**व्यापारी व विक्रेते चिंतेत**

अवकाळी पाऊस सुरू असल्यामुळे तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या बाजारपेठेमध्ये गिऱ्हाईक फिरकत नाही. त्यामुळे येथे असलेले छोटे-मोठे व्यवसायिक व्यापारी यांचा धंदा होत नाही. त्यामुळे तेदेखील चिंतेत आहेत. याशिवाय आठवडा बाजारपेठांवरदेखील अवकाळी पावसाचे संकट ओढावले आहे. फिरते विक्रेतेसुद्धा अवकाळी पावसामुळे हतबल झाले आहेत.

**सुकी मासळी व्यवसायला फटका**

सुधागड तालुक्यातील पेडली येथील सुकी मासळी विक्रेते सुनील कोळी यांनी सांगितले की, यंदा मे महिन्यातच पावसाला सुरुवात झाली आणि याचवेळी सुकी मासळीचा व्यवसाय तेजीत असतो. त्यामुळे मे महिन्यात मोठ्या प्रमाणात माल भरून ठेवला होता, मात्र अवकाळी पाऊस सुरू झाल्याने सर्व माल खराब झाला परिणामी नुकसानीला सामोरे जावे लागले.

आता दिवाळीमध्येदेखील सुकी मासळीचा धंदा तेजीत असतो, मात्र परतीचा पाऊस सुरू असल्यामुळे माल खराब होण्याची भीती आहे आणि उठावसुद्धा कमी आहे. शिवाय घाऊक बाजारात सुक्या मासळीच्या किमतीदेखील वाढल्या आहेत.

# माणगाव तालुका पाटबंधारे खाते सेवानिवृत्त कर्मचारी संघाचा वर्धापन दिन साजरा





**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुका पाटबंधारे खाते सेवानिवृत्त कर्मचारी संघाचा अकरावा वर्धापन दिन व मार्गदर्शन मेळावा मंगळवारी (दि.२८) संघाचे अध्यक्ष नथुराम पाष्टे यांच्या अध्यक्षतेखाली व मान्यवरांच्या तसेच सदस्यांच्या उपस्थितीत कुणबी भवन येथे उत्साहात साजरा झाला.

वर्धापन दिनानिमित्त संघातर्फे मान्यवरांच्या उपस्थितीत मार्गदर्शनपर मेळावा तसेच ७५ वर्ष वय झालेल्या सदस्यांचा सत्कार व संघातील सभासदांची मुले, नातेवाईक जे शैक्षणिक वर्ष सन २०२५मध्ये इयत्ता दहावी व बारावीमध्ये उत्तीर्ण झालेत यांच्यासह इंजिनिअर, वकील, पदवीधर अशा गुणवंतांचा गुणगौरव आणि उल्लेखनीय कामगिरी केलेल्या कर्मचाऱ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. प्रारंभी संघाच्या दिवंगत सदस्यांना संघातर्फे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या वेळी अप्पर कोषागार अधिकारी रायगड देवेंद्र पाटील, जिल्हा शासकीय-निमशासकीय कर्मचारी समन्वय समिती अध्यक्ष सुरेश पालकर, रायगड जिल्हा पेन्शनर्सचे फेडरेशनचे सरचिटणीस काशिनाथ जाधव, माणगाव तालुका सेवानिवृत्त कर्मचारी संघटना अध्यक्ष सुनील तार, डॉ. संतोष जाधव आदींनी उपस्थितांना मौलिक मार्गदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संघाचे उपाध्यक्ष शंकर पवार, खजिनदार रामभाऊ टेंबे, सचिव बाळ उभारे, सहसचिव नारायण मालोरे, सल्लागार सुरेखा यादव, सदस्य विनायक सापळे, काशीराम पाखुर्डे, बाळाराम नवगणे,विष्णू सावंत, नथुराम लहाने, रमेश डवले, विष्णू सावंत, स्वाती पवार, श्रीराम जाधव, बाळाजी शिर्के, नथुराम अंधेरे, साबाजी पालकर, लक्ष्मण मोरे, भागोजी शिर्के, सुभाष दोशी, शांताराम पवार, भगवान भोनकर, सुरेश टेंबे व सर्व सेवानिवृत्त कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# श्रीवर्धनच्या महेश्वर आळी मित्र मंडळाचे राज्यस्तरीय गडकिल्ले स्पर्धेत यश

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन शहरातील महेश्वर आळी मित्र मंडळाने महाराष्ट्र राज्यस्तरीय गडकिल्ले स्पर्धा इको पंढरीमध्ये सहावा क्रमांक प्राप्त केला आहे. इको पंढरी प्रस्तुत गडकिल्ले बांधणी स्पर्धा २०२५ दिवाळीनिमित्त विशेष आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नाव नोंदणी अनिवार्य होती. यामध्ये महेश्वर आणि मित्र मंडळाने आपली नाव नोंदणी करून सहभाग घेतला होता. मंडळाने राजगड किल्ल्याची प्रतिकृती साकारली.



अतिशय सुंदर व मनमोहक असा किल्ला या महेश्वर आळी मित्रमंडळातर्फे बनवण्यात आला होता. इको पंढरी या संस्थेकडे या किल्ल्याची छायाचित्रे, त्याचप्रमाणे रील बनवून पाठवण्यात आली होती. या मित्र मंडळाला १५० किल्ल्यांपैकी सहावा क्रमांक प्राप्त झाला आहे. यामध्ये एक ते दहा क्रमांक प्राप्त करणाऱ्या सर्व मंडळांना चषक व प्रशस्तीपत्रक देण्यात आले आहे. किल्ल्याची सुंदर अशी प्रतिकृती साकारण्यासाठी महेश्वर आळी मित्र मंडळाच्या सर्व सदस्यांनी खूप मेहनत घेतली होती. अनेक मान्यवरांकडून या मंडळास शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# हिटमॅन रोहित शर्मा अव्वल स्थानी

## वनडेमध्ये गिलला मागे टाकत रचला इतिहास

**मुंबई : प्रतिनिधी**

ऑस्ट्रेलियातील एकदिवसीय मालिकेच्या प्रभावी कामगिरीनंतर रोहित शर्माने आयसीसी एकदिवसीय क्रमवारीत अव्वल स्थान मिळवले आहे. विशेष म्हणजे माजी कर्णधार असलेल्या रोहितने एकदिवसीय कर्णधार शुभमन गिलला मागे टाकून हे स्थान मिळवले. यासह रोहित जगातील 'नंबर वन' वनडे फलंदाज बनणारा सर्वात वयस्क खेळाडू बनला आहे.




ताज्या एकदिवसीय क्रमवारीत रोहित शर्माने गिल आणि इब्राहिम झदरानला मागे टाकत ७८१ रेटिंग गुणांसह अव्वल स्थान मिळवले आहे. दुसरीकडे शुभमन गिल पहिल्या क्रमांकावरून तिसऱ्या क्रमांकावर घसरला आहे.

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत रोहित शर्माने इतर सर्व फलंदाजांना मागे टाकत सर्वाधिक धावा केल्या. पहिल्या सामन्यात त्याने चांगली कामगिरी केली नाही, परंतु दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात त्याने अर्धशतक झळकावले आणि शेवटच्या सामन्यात शतक झळकावून संघाला विजय मिळवून दिला. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत रोहित शर्माने १०१च्या सरासरीने २०२ धावा केल्या. त्याच्या कामगिरीमुळे तो जगातील पहिल्या क्रमांकाचा फलंदाज बनला. त्याच्या संपूर्ण कारकिर्दीत हे पहिल्यांदाच घडले.

### विश्वविक्रमाला गवसणी

रोहित शर्माने जगातील नंबर १ वनडे फलंदाज बनून एक विश्वविक्रम रचला आहे. तो अशी कामगिरी करणारा सर्वात वयस्कर खेळाडू बनला. रोहितने ३८ वर्षे १८२ दिवसांच्या वयात एकदिवसीय सामन्यांमध्ये अव्वल रँकिंग मिळवले. रोहितने १८ वर्षांपूर्वी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते आणि आता तो पहिल्यांदाच नंबर १ रँकिंगवर पोहचला. एकदिवसीय क्रिकेटमध्ये नंबर १ रँकिंग मिळवणारा रोहित फक्त पाचवा भारतीय फलंदाज आहे. सचिन तेंडुलकर हा अव्वल क्रमांक मिळवणारा पहिला फलंदाज होता. त्यानंतर धोनी नंबर १ झाला. मग विराट कोहली आणि शुभमन गिलने हा बहुमान मिळवला होता. त्यानंतर आता रोहितने अव्वल क्रमांक पटकावला.

# इंग्लंडच्या 'बॅझबॉल'चा वाजला बँड!

## न्यूझीलंडची टी-२० मालिकेत विजयी आघाडी

**हॅमिल्टन : वृत्तसंस्था**

हॅमिल्टन येथे खेळल्या गेलेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात पाहुण्या इंग्लंड संघाला दारूण पराभवाचा सामना करावा लागला. न्यूझीलंडने इंग्लंडला पाच गडी राखून नमवत मालिकेवरही कब्जा केला.

इंग्लंडने न्यूझीलंड दौऱ्याची सुरुवात धमाकेदार शैलीत केली होती. त्यांनी तीन सामन्यांची टी-२० मालिका १-० अशी जिंकली. मालिकेतील दोन सामने पावसात वाहून गेले. तथापि, टी-२० मालिकेतील यश इंग्लंड संघ एकदिवसीय मालिकेत कायम ठेवू शकला नाही. यजमान न्यूझीलंडने पहिले दोन सामने जिंकून एकदिवसीय मालिका आपल्या नावे केली.

हॅमिल्टनमधील दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात न्यूझीलंडने इंग्लंडचा पाच गडी राखून दारूण पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडचा संघ केवळ १७५ धावांवर तंबूत परतला. प्रत्युत्तरादाखल न्यूझीलंडने रचिन रवींद्र आणि डॅरिल मिचेल यांच्या शानदार अर्धशतकांच्या




जोरावर ३४व्या षटकात पाच गडी गमावून १७६ धावांचे लक्ष्य पूर्ण केले.

अशा प्रकारे न्यूझीलंडने तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी अभेद्य आघाडी घेतली आहे. यापूर्वी किवी संघाने बे ओव्हल येथे झालेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात इंग्लिश संघाला चार गडी राखून पराभूत केले होते. एकदिवसीय मालिकेत सलग दोन सामने जिंकून न्यूझीलंडने इतिहास रचला आहे.

२०२३च्या विश्वचषकानंतर इंग्लंड संघ विजयासाठी झगडत आहे. विश्वचषकानंतर इंग्लिश संघाने एकूण २५ सामने खेळले असून त्यांना फक्त आठ सामन्यांमध्ये विजय मिळाला आहे, तर १७ सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला आहे. या काळात त्यांनी सातपैकी सहा द्विपक्षीय मालिका गमावल्या आहेत.


### १७ वर्षांचा प्रदीर्घ दुष्काळ संपुष्टात

विशेष म्हणजे, न्यूझीलंडच्या संघाला इंग्लंडविरुद्ध एकदिवसीय मालिकेत १२ वर्षांनंतर विजय मिळाला आहे. न्यूझीलंडने इंग्लंडविरुद्धची अखेरची द्विपक्षीय एकदिवसीय मालिका २०१३मध्ये परदेशात जिंकली होती. इतकेच नव्हे, तर किवी संघाने आपल्या घरच्या मैदानावरचा १७ वर्षांचा प्रदीर्घ दुष्काळदेखील संपवला आहे. आपल्याला आश्चर्य वाटेल की, न्यूझीलंडने २००८नंतर प्रथमच आपल्या घरच्या मैदानावर इंग्लंडविरुद्ध एकदिवसीय मालिका जिंकण्याची ही मोठी कामगिरी केली आहे.

# सात महिन्यांच्या गर्भवतीने उचलले तब्बल १४५ किलो वजन

**अमरावती : वृत्तसंस्था**

दिल्ली पोलीस दलातील सात महिन्यांच्या गर्भवती महिला कॉन्स्टेबलने आंध्र प्रदेश येथे आयोजित अखिल भारतीय पोलीस वेटलिफ्टिंग क्लस्टर २०२५-२६मध्ये सहभाग घेतला. या स्पर्धेत तब्बल १४५ किलो वजन उचलून तिने कांस्यपदक जिंकले. त्यासोबतच तिने स्क्वॉटमध्ये १२५ किलो आणि बेंच प्रेसमध्ये ८० किलोचे वजन उचलले.



दिल्ली पोलीस दलातील या कॉन्स्टेबलचे नाव सोनिका यादव असे आहे. माहितीनुसार सोनिका नॅशनल पॉवरलिफ्टर आहेत. त्यांचे इन्स्टाग्राम पाहिले तर त्यांनी स्वतःचे वजन खूप प्रमाणात कमी केले आहे, ज्याचे फोटोही त्यांनी पोस्ट केलेत. सोनिका ड्युटीसोबतच कुटुंबाची जबाबदारी सांभाळतात. त्याशिवाय फिट राहण्यासाठी त्या जीमलाही जात असतात.

सोनिका यांना मे महिन्यात त्या गर्भवती असल्याचे कळले, तेव्हाही त्यांनी जीमला जाणे आणि ट्रेनिंग करणे सोडले नाही. त्यांनी गर्भवती असतानाही वेटलिफ्टिंग सुरूच ठेवले. त्याच मेहनतीच्या बळावर त्यांना इतके वजन उचलणे सहज शक्य झाले. सोनिका यांनी दिलेल्या मुलाखतीत लूसी मार्टिन्स यांचे नाव घेतले. लूसी यांनीही त्या गर्भवती असताना इतकेच वजन उचलले होते. त्यांच्याकडून प्रेरणा घेतल्याचे सोनिका यांनी म्हटले.

दरम्यान, या महिलेचा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. तिच्या धाडसी आणि साहसी पराक्रमाचे कौतुक अनेक जण करत आहेत, तर एक वर्ग या महिलेच्या पराक्रमावर नाराजी व्यक्त करत आहे.

# मोहम्मद रिझवानचे पीसीबीविरुद्ध बंड



**कराची : वृत्तसंस्था**

पाकिस्तान क्रिकेटमध्ये एक नवीन वाद सुरू झाला आहे. या वादामागील मूळ कारण म्हणजे पाकिस्तानचा स्टार खेळाडू मोहम्मद रिझवान याची नाराजी. त्याने संघनिवडीवरून नाराज झाल्यानंतर आता पाक क्रिकेट बोर्डाविरुद्ध बंड पुकारले आहे.

मिळालेल्या वृत्तानुसार रिझवानने पाकिस्तान क्रिकेट बोर्डाच्या केंद्रीय करारावर स्वाक्षरी करण्यास नकार दिला आहे. केंद्रीय करारात एकूण ३० पाकिस्तानी खेळाडूंचा समावेश करण्यात आला आहे, पण आतापर्यंत फक्त २९ खेळाडूंनीच करारावर स्वाक्षरी केली आहे. रिझवान हा एकमेव खेळाडू आहे, ज्याने अद्याप करारावर स्वाक्षरी केलेली नाही.

जेव्हा दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी पाकिस्तान संघाची घोषणा करण्यात आली, तेव्हा पीसीबीने कोणतीही पूर्वसूचना न देता रिझवानला त्या संघातून वगळले. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाच्या मनमानी कारभाराला कंटाळून यष्टीरक्षक-फलंदाजाने स्वाक्षरी न करण्याचा निर्णय घेतला. टी-२० संघातून वगळल्याबद्दल त्याने पीसीबीकडून स्पष्टीकरण मागितले आहे.

# सूर्यकुमारच्या आईने श्रेयससाठी केली खास पूजा

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताच्या वनडे संघाचा उपकर्णधार श्रेयस अय्यर सध्या सिडनीमधील हॉस्पिटलमध्ये उपचार घेत आहे. ऑस्ट्रेलियाविरूद्ध झालेल्या तिसऱ्या वनडे सामन्यात फिल्डिंग करताना त्याला दुखापत झाली होती. दरम्यान, टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवच्या आईने श्रेयस अय्यर लवकर ठिक व्हावा यासाठी पूजा केली.



श्रेयसने फिल्डिंग करताना मागच्या दिशेने धावत जाऊन एक कमालीचा झेल टिपला, पण तो डाव्या बाजूवर मैदानावर कोसळला आणि त्याच्या बरगडीला दुखापत झाली. बरगडीला प्रचंड फटका बसल्यानंतर त्याच्या धमणीला दुखापत झाली आणि त्यामुळे अंतर्गत रक्तस्त्राव होत असल्याने त्याला आयसीयूमध्ये दाखल केले. त्याच्या प्रकृतीत सुधारणा झाल्यानंतर श्रेयसला आयसीयूमधून बाहेर आणण्यात आले, पण यानंतरही तो हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांच्या विशेष देखरेखीखाली आहे.

श्रेयस अय्यरला मैदानावर झालेली ही गंभीर दुखापत पाहता सर्वच जण तो लवकर बरा व्हावा यासाठी त्याला शुभेच्छा देत आहेत. यादरम्यान सूर्यकुमार यादवच्या आईने श्रेयससाठी खास पूजा केली आहे. श्रेयसच्या बहिणीने इन्स्टाग्रामवर व्हिडीओ शेअर केला आहे, जो आता व्हायरल होत आहे.

सूर्यकुमार यादवच्या आईने छटपूजेच्या वेळी श्रेयस अय्यर लवकर बरा व्हावा यासाठी प्रार्थना केली. दिनलने शेअर केलेल्या या व्हिडीओमध्ये सूर्याची आई म्हणताना दिसत आहे की, श्रेयसच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी म्हणून मी सर्वांना प्रार्थना करायला सांगू इच्छिते, कारण काल मी ऐकले की त्याला बरे वाटत नाहीये. त्यामुळे तो त्याच्या आईकडे बरा होऊन लवकर परत येऊदे.

# षटकार मारूनही फलंदाज बाद! रोमहर्षक सामन्यात विंडीजची बांगलादेशवर मात

**चितगाव : वृत्तसंस्था**

वेस्ट इंडिज आणि बांगलादेश यांच्यातील तीन सामन्यांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेतील पहिला सामना नुकताच चितगाव येथे खेळवण्यात आला. या रोमांचक सामन्यात कॅरेबियन संघाने यजमान बांगलादेशवर १६ धावांनी विजय मिळवत मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. बांगलादेशला शेवटच्या क्षणी विजयाची सुवर्णसंधी होती, मात्र तस्किन अहमदच्या विकेटमुळे सामन्याचे रूप पलटले.

सामन्याच्या अखेरच्या टप्प्यात बांगलादेशी फलंदाज तस्किन



अहमद बाद झाल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. १९व्या षटकात वेस्ट इंडिजकडून रोमारियो शेफर्ड गोलंदाजी करत होता. या षटकाच्या चौथ्या चेंडूवर तस्किन अहमदने एक उत्तुंग षटकार मारला, मात्र जोरदार फटका मारताना त्याचा पाय चुकून स्टंपला लागला. त्यामुळे नियमानुसार त्याला 'हिट विकेट' बाद देण्यात आले. त्यानंतर तस्किनला निराश होऊन पॅव्हेलियनमध्ये परतावे लागले आणि बांगलादेशच्या आशा संपुष्टात आल्या.

नाणेफेक जिंकून वेस्ट इंडिजने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. निर्धारित २० षटकांत ३ गडी गमावून त्यांनी १६५ धावा केल्या होत्या. या लक्ष्याचा पाठलाग करताना बांगलादेशकडून तन्झीम हसन सकीबने सर्वाधिक ३३ धावा केल्या, तर तौहिद हृदॉयने २८ धावांचे योगदान दिले. या दोघांच्या व्यतिरिक्त बांगलादेशच्या कोणत्याही फलंदाजाला चांगली कामगिरी करता आली नाही, ज्यामुळे बांगलादेशला पराभवाचे तोंड पहावे लागले. वेस्ट इंडिजकडून जेडेन सील्स आणि जेसन होल्डर यांनी प्रत्येकी तीन, तर अकील हुसेनने दोन विकेट्स घेतल्या.











दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com